
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सत्ताविसावे / अंक ७ / जुलै २०२६

## संपादकीय

### राष्ट्रीय विज्ञानकथा दिन

आपल्या देशात १९ जुलै हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञानकथा दिन' म्हणून पाळला जातो. या तारखेचे औचित्य असे की, या तारखेला महान भारतीय शास्त्रज्ञ प्राध्यापक जयंत नारळीकर यांचा वाढदिवस असतो. डॉ. जयंत नारळीकरांचा जन्म कोल्हापूर येथे जुलै १९, १९३८ रोजी झाला. त्यांनी खगोलशास्त्रात मोलाची भर घातली. त्याचबरोबर विज्ञान प्रसाराचे कार्य हिरिरीने केले. मराठी भाषेतून विज्ञान प्रसार करण्यासाठी स्थापन झालेल्या मराठी विज्ञान परिषदेचे ते काही काळ अध्यक्ष होते. या सगळ्या बाबींचा विचार करून, मराठी विज्ञान परिषदेने त्यांचा वाढदिवस (१९ जुलै), हा 'राष्ट्रीय विज्ञानकथा दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरवले. इसवी सन २०२२ पासून यांची सुरुवात झाली.

प्राध्यापक जयंत नारळीकर यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ञ होते. वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित विभागाचे ते प्रमुख होते. त्यामुळे जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी येथे झाले, तेही हिंदी माध्यमाच्या शाळेतून. १९५७ साली त्यांनी बीएससी ही पदवी प्राप्त केली. त्यात ते विद्यापीठात पहिले आले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज येथे गेले. तेथे त्यांनी बी.ए., एम.ए. व पीएचडी या पदव्या मिळविल्या. शिवाय, रँग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल व इतर अनेक बक्षिसे मिळविली. १९७२ साली ते भारतात परतले आणि मुंबई येथील 'टाटा मूलभूत संशोधन संस्थे'च्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून काम करू लागले. १९८८ साली त्यांची पुणे येथील 'आयुका' या संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. तोपर्यंत डॉ. नारळीकर 'टिआयएफआर'च्या अनेक कामांत सहभागी होत असत. ज्या होमी भाभा विज्ञान केंद्रात मी काम करीत होतो त्या केंद्राचे ते सल्लागार होते. वेगवेगळ्या प्रकल्पांची आखणी आणि मूल्यमापन या निमित्ताने मला त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळत असे. ते सहकाऱ्यांशी अतिशय सौजन्याने वागत असत. विशेषत: तरुण संशोधकांना ते सतत प्रोत्साहन देत असत. १९८३ मध्ये मी 'टिआयएफआर'मध्ये माझे संशोधन सादर केले. त्यानंतर माझ्या पाठीवर हात ठेवून त्यांनी माझे कौतुक केले ते अजूनही माझ्या स्मरणात आहे. १९९२ मध्ये सोलापूर शहरात भरलेल्या 'मराठी विज्ञान परिषदे'च्या अधिवेशनात डॉ. नारळीकर यांच्याच हस्ते मला सन्मान पत्र देण्यात आले होते.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

चार दशकांहून अधिक कालावधी त्यांनी 'खगोलभौतिकी' या क्षेत्रात संशोधन केले. आपले संशोधन संशोधन पत्रिकेत प्रकाशित करण्याबरोबरच विज्ञानाचा समाजात प्रसार कसा होईल यासाठी ते प्रयत्नशील असत. सामान्य माणसाला खगोलशास्त्र समजवण्यासाठी त्यांनी विविध मार्ग चोखाळले. दूरदर्शन आणि आकाशवाणी या प्रसारमाध्यमांचा उपयोग करून त्यांनी अनेक कार्यक्रम सादर केले. विविध मराठी नियतकालिकांसाठी त्यांनी लेख लिहिले. मराठी विज्ञान परिषदेच्या विज्ञान पत्रिकेत ते सातत्याने लेख प्रकाशित करीत असत. याखेरीज 'अंतराळातील भस्मासुर, अभयारण्य, टाइम मशीनची किमया, प्रेषित, यक्षांची देणगी, याला जीवन ऐसे नाव, वामन परत न आला, व्हायरस, आकाशाशी जडले नाते, गणितातील गमतीजमती, युगायुगाची जुगलबंदी, नभात हसरे तारे, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेची अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विश्वाची रचना, विज्ञानाचे रचयिते, सूर्याचा प्रकोप' अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. एवढेच नव्हे तर, 'चार महानगरातील माझे विश्व' या नावाचे आत्मचरित्रात्मक पुस्तक देखील त्यांनी लिहिले. असे हे महान संशोधक आणि लेखक २० मे २०२५ रोजी आपल्याला सोडून गेले.

विज्ञान कथा हा विज्ञान लेखनाचा एक वेगळाच प्रकार आहे. यात वैज्ञानिक तत्त्वे कथेच्या रूपात सादर करतात. या कथा खऱ्या किंवा कल्पित असू शकतात. असे जरी असले तरी, 'विज्ञान कथा' हा जोडशब्द काल्पनिक कथेसाठी जास्त वापरला जातो. विज्ञानातील एखादे सत्य घेऊन आपण पुढे गेलो तर काय होण्याची शक्यता आहे याची कल्पना लेखक करतात. अशा कल्पनारम्य कथेला प्रामुख्याने 'विज्ञान कथा' असे म्हणतात. इंग्रजी भाषेत अशा कथा अनेक लेखकांनी लिहिलेल्या आहेत. त्यात एच. जी. वेल्स, आयझॅक ॲसिमॉव, ऑर्थर ही क्लार्क इत्यादी लेखकांचा समावेश होतो. या लेखकांनी अंतराळ प्रवास, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र मानव या अनेक बाबींचे भाकीत केले होते. ते आता प्रत्यक्षात उतरले आहेत. इंग्रजीतली पहिली विज्ञानकथा फ्रँकेस्टाईन ही १८१८ साली मेरी शेली या लेखिकेने लिहिली अशी नोंद आढळते. त्यानंतर बऱ्याच काळानंतर इंग्रजी साहित्यात निर्माण झालेला विज्ञानसाहित्याचा प्रवाह मराठी भाषेतही यायला सुरुवात झाली.

मराठी भाषेतील विज्ञानकथेची सुरुवात सर्वप्रथम १९०० मध्ये कृष्णाजी आठले यांच्या ज्यूल्स व्हर्नच्या कादंबरीच्या 'चंद्रलोकची सफर' या नावाने केलेल्या अनुवादाने झाली. त्यानंतर१९११ साली श्रीधर रानडे यांनी 'तारेचे हास्य' ही विज्ञानकथा लिहिली. वा. म. जोशी यांनी लिहिलेल्या दोन कथा 'अप्रकाशित किरणांचा दिव्य प्रकाश' आणि 'वामलोचना' १९१४ साली प्रकाशित झाल्या.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी विज्ञान कथा, कादंबऱ्या लिहिण्याचे काम जरा थंडावले. परंतु १९५० नंतर अनुवादित विज्ञान कथांचे व कादंबऱ्यांचे लेखन पुन्हा सुरू झाले. भा. रा. भागवत यांनी ज्यूल्स व्हर्न आणि एच.जी. वेल्स यांच्या, 'अराउंड द वर्ल्ड इन ८० डेज, ट्वेन्टी थाऊजंड लीग अंडर द सी, इनव्हिजिबल मॅन' या कथा येथील मराठीत लिहिल्या. स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान तंत्रज्ञानाला जसजसे महत्त्व यायला लागले तसा त्याचा प्रसारही वेगाने व्हायला लागला. विज्ञान जीवनाला सर्व अंगांनी भिडायला लागले. आणि त्यानंतर आधुनिक विज्ञानकथांचा उदय झाला.

(पृष्ठ क्र.१८ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक ७/जुलै २०२६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३१ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : ९१५२४८७७६५**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | कवीकुलगुरू कालिदास | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | २ |
| ३) | पद्मविभूषण डॉ. तीजन बाई : पंडवानी लोककलेची जागतिक ओळख | डॉ. कीर्ती आगाशे | ४ |
| ४) | जागतिक वारसा स्थळ : नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले विजयदुर्ग | दिलीप नारायण वंडलकर | ६ |
| ५) | अणुचाचणीच्या स्थलनिवडीची कहाणी | नरेंद्र गोळे | १४ |
| ६) | समुद्राखाली भारताचा 'सोनार सापळा'! | संतोष कारखानीस | १९ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कवीकुलगुरू कालिदास

*कवीकुलगुरू कालिदास हे जगद्विख्यात वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व. त्यांनी केलेल्या रचनांबद्दल, तसेच विचारधारांबद्दल प्रस्तुत लेखात आढावा घेतला आहे - संपादक*

कालिदासाच्या 'मेघदूत' या खंडकाव्यात आषाढस्य प्रथम दिवसे असा उल्लेख येतो. या उल्लेखामुळेच आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रख्यात भारतीय कवी कालिदास याचा जन्मदिवस जगभर साजरा केला जातो. याला 'महाकवी कालिदास दिन' असेही म्हणतात. विरहकातर झालेल्या कोणा यक्षाने आषाढाच्या पहिल्या दिवशी आकाशात गर्दी करणाऱ्या मेघांना उद्देशून लिहिलेलं हे अजरामर काव्य. कालिदासाचा काळ नेमका कोणता यावर विद्वानांमध्ये मतभेद आहेत. मात्र त्याच्या प्रसिद्ध कलाकृती मध्ये आषाढ महिन्याचे एवढे नेत्रसुखद वर्णन आले आहे की, हा संपूर्ण महिना कालिदासाच्या मेघदूतातील मंदाक्रांतावृत्तातील सुंदर श्लोकांनी व्यापून गेलेला असतो.

'कविताकामिनीचा विलास', 'कविकुलगुरू', 'महाकवी' अशा वेगवेगळ्या नावांनी कालिदासाला ओळखले जाते. कालिदास म्हटलं की आपल्यासमोर उभी राहते ती शकुंतला, मेघदूतातील विरहकातर यक्ष, रघुवंश महाकाव्यातील नंदिनीची सेवा करणारे राजा दिलीप व सुदक्षिणा आणि अशी अनेक पात्रं. ज्येष्ठ इंग्रजी लेखक विल्यम जोन्सने कालिदासाला 'भारताचा शेक्सपियर' असं संबोधलं होतं. यामध्ये दोन्ही साहित्यिकांची जीवनविषयक दृष्टी अधोरेखीत होते. कालिदास एक मोठा कवी होऊन गेला एवढा एकच विचार प्रत्येक भारतीयाला माहिती असतो; मात्र या साहित्यिकाच्या लेखनाचा पैस मोठा होता; त्यांनी उभं केलेलं मानवी भावविश्व अगाध होतं हे अभ्यासांती समजतं.

अंत:पुरातील गुजगोष्टींपासून हिमालयाच्या उत्तुंग शिखरापर्यंत कालिदासाची लेखणी लीलया संचार करते. भोग व त्याग, शृंगार व वैराग्य, काम व मोक्ष यांचा सुरेख समन्वय कालिदास साधतो. डॉ. के. ना. वाटवे यांनी म्हटल्याप्रमाणं वाल्मीकीच्या नीतीला आणि व्यासांच्या बुद्धीला कालिदासाने सौंदर्याची जोड दिली. व्यासांनी सत्य, वाल्मीकीने शिव, तर कालिदासाने सौंदर्य यांची प्रचिती प्रामुख्याने दिली. व्यास, वाल्मीकी आणि कालिदास यांच्यात भारतीय संस्कृतीचे सार साठवलेले आहे, असे महर्षी अरविंद म्हणतात ते याचमुळे.

कालिदासाने रघुवंश व कुमारसंभव ही दोन महाकाव्ये लिहिली. या काव्यात उपमा, उत्प्रेक्षा वगैरे अलंकारांची रेलचेल आहे. कथेच्या दृष्टीने महाकाव्याला साजेसा अत्यंत मोठा पट कालिदास आपणा समोर उभा करतो. त्यातील सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक व मानसशास्त्रीय संदर्भ आज देखील समयोचित वाटतात. तत्कालीन समाजाचं आकलन करण्यासाठी ही महाकाव्ये म्हणजे महत्त्वाचे साधन ग्रंथ आहेत. प्रसन्न भाषा, अलौकिक प्रतिभाविष्कार आणि अभिजात कल्पनाविलास या गुणांमुळे ही महाकाव्ये अजरामर झाली.

'ऋतुसंहार' ही कालिदासाची पहिली रचना असे समजले जाते. इथे 'संहार' या शब्दाचा अर्थ एकत्र करणे, बांधणे गुंफणे अशा अर्थाने योजला आहे. ऋतुसंहार म्हणजे ऋतूंची शोभायात्रा. सहा ऋतूंचे सहा सोहळे पाहून रसिकांचे भान हरपून जाते. ऋतुसंहार या काव्यात ग्रीष्मादी ऋतूंच्या प्रभावामुळे चराचरांत होणारे बदल आपल्या सौंदर्यशोधक नजरेने टिपून या काव्यात अक्षरबद्ध केले आहेत. कालिदासाच्या संवेदनक्षम प्रतिभेचा हा

सुरुवातीचा अविष्कार. या काव्यातून कवीची सौंदर्यदृष्टी प्रतीत होते.

मेघदूत या खंडकाव्यात हिमालयाच्या कुशीत अलका नगरीत राहणाऱ्या एका यक्षाची कथा आहे. पत्नी वियोगाचा शाप मिळाल्यामुळे दूरवर दक्षिणेत रामगिरी पर्वतावर तो वास्तव्य करतो. आषाढाच्या पहिल्याच दिवशी पर्वतावर धडका देणाऱ्या काळ्याकभिन्न मेघांना पाहून त्याची विरहवेदना दाटून येते. मेघाला दूत समजून आपल्या प्रियाला दिलेला संदेश मेघदूत या काव्यात येतो. कालिदासाची सौंदर्यदृष्टी मंदाक्रांता वृत्तातील प्रत्येक श्लोकांमध्ये आपल्याला पाहायला मिळते.

विशेष करून मराठी साहित्यिकांनी तर मेघदूतावर जीवापाड प्रेम केलं आहे. या काव्याचे जवळपास २८ अनुवाद मराठीत झाले असून यामध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर, चिं. द्वा. देशमुख, रा. ची. श्रीखंडे, ना. ग. गोरे, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, वसंत बापट व शांता शेळके यांचाही समावेश आहे. वानगीदाखल शांता शेळके विरह वेदनेने त्रस्त झालेल्या यक्षपत्नीची भावनिक आंदोलनं खालील श्लोकाप्रमाणे मराठी अनुवादातून मांडतात :

*उंबरठ्यावर फुले मांडुनी एक एक ती दिवस मोजिते*
*किती विरहाचे मास राहिले पुन्हा पुन्हा अजमावुनी बघते*
*रमते तेव्हा कल्पनेत मम सहवासाची चित्रे रेखून*
*विरहा मध्ये रमणी बहुधा असेच करिती मनोविनोदन।*

कालिदासाच्या मेघदूताने हिंदी साहित्य विश्वावर देखील मोहिनी घातली आहे. ज्येष्ठ हिंदी नाटककार मोहन राकेश यांचं 'आषाढ का एक दिन' हे एक महत्त्वाचं नाटक आहे. कालिदासाच्या जीवनातील आणि साहित्यातील काही घटनांचा उपयोग करून लिहिलेलं हे एका व्यापक जीवन विषयक समस्येला भिडणारे नाटक.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी देखील कालिदासाचा मोठा व्यासंग केला होता. मेघदूतावर त्यांचं विशेष प्रेम होतं. ते लिहितात की, 'आज मी पूर्वेकडच्या श्यामल वंग देशात बसून मेघदूत वाचतोय. पावसाच्या धारा बरसत आहेत, विजा चमकत आहेत. अशावेळी घराचे दार बंद करून मी एकटाच बसलोय. हे कवी, तुझ्या मंत्रानं माझ्या ह्रदयात कोंडलेली व्यथा मोकळी झाली. मला अनंत सौंदर्यात चिररात्री एकाकी जागून विरह वेदना सोसणाऱ्या विरहिणी प्रियेचा विरहरूपी स्वर्गलोक मिळाला'. कालिदास जसा कवी होता तसाच एक क्रांतदर्शी नाटककार देखील होता. त्याने तीन नाटकं लिहिली.

'मालविकाग्निमित्र' या पाच अंकी नाटकात राजा अग्निमित्र आणि मालविका या राजकन्येसोबत झालेल्या प्रणय कथेला नाट्यरूप दिले आहे. 'विक्रमोर्वशीयम' या नाटकात वेद वाङ्मयात आणि पुराणांमध्ये प्रसिद्ध असलेल्या पुरुरवा आणि उर्वशी यांच्या प्रेमकथेचं दर्शन आपल्याला होतं. कालिदासाचं सर्वांत प्रसिद्ध नाटक म्हणजे 'अभिज्ञान शाकुंतल.' 'काव्येषु नाटकं रम्यम्‌ तत्र रम्या शकुंतला' असं एका कवीने म्हटले आहे. अर्थात सर्व नाटकांत श्रेष्ठ असं हे शाकुंतल नाटक म्हणजे संस्कृत नाट्यसृष्टीचं अमोल लेणं आहे. जर्मन कवी गोएथे शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला असे म्हटले जाते. कालिदासाच्या प्रतिभा-वेलीवरचं सर्वांत टवटवीत, सुगंधानं भरलेलं पुष्प म्हणून या नाटकाचा उल्लेख केला जातो. अभ्यासकांच्या मते शेक्सपियरच्या 'द टेम्पेस्ट' या नाटकाची कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल' नाटकाशी तुलना होऊ शकते. विशेष म्हणजे या दोनही नाटकांतील नायिका शकुंतला व मिरांडा यांच्या मध्ये साम्यस्थळं आढळतात.

वसंत बापट यांनी म्हटलं आहे, 'संस्कृत वाङ्मयाचा महासागरात चित्रमय पोळ्यांची बेटे आहेत, अलौकिक रत्न गुंफा आहेत त्या कालिदासाच्या कलाकलापाच्या. बघणाऱ्या, बघशील किती, असे हे रंगांचे वैभव आहे. कितीतरी शतके कालिदासाची कविता मानवी मनाला निर्विकल्प समाधीचा आनंद देत आहे.'

(पृष्ठ क्र. १३ वर)

आयुष्य बदलण्यासाठी वेळ सर्वांना मिळतो; पण वेळ बदलण्यासाठी आयुष्य पुन्हा मिळत नाही.

# पद्मविभूषण डॉ. तीजन बाई : पंडवानी लोककलेची जागतिक ओळख

*पंडवानी म्हणजे महाभारतावर आधारित लोककथा, गायन, निवेदनाची कला. या कलेला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देणाऱ्या व पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण हे अत्युच्च सन्मान मिळालेल्या डॉ. तीजन बाई यांची ही स्फूर्तिदायक माहिती – संपादक*

रामायण, महाभारत आणि त्यातील कथा म्हणजे भारतीय मनांच्या मर्मबंधातील ठेवी. या महाकाव्यातील कथा ऐकणं–ऐकवणं, त्याचा आपल्या जगण्यातील संघर्षाशी संबंध लावणं आणि त्यातून नेमका बोध घेणं हे आपल्या अनेक पूर्वजांनी मौखिकरित्या दुसऱ्या पिढीला शिकवून आजपर्यंत जतन केलं. या साठी त्यांच्याकडे माध्यमं होती ती लोकसंगीत, लोकगायन आणि लोकनृत्य या कलांची. छत्तीसगडची पंडवानी ही अशीच महाभारतावर आधारित लोककथा गायन–निवेदनाची कला. जगभर ही कला पोहोचविण्याचं आणि या कलेचं अस्तित्व टिकविण्याचं मोठं श्रेय जातं पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकार दिवंगत डॉ. तीजनबाई यांना.

पंडवानी या प्राचीन लोककलेमधील पंडवानी या शब्दाचा अर्थ आहे 'पांडवांची कथा किंवा पांडवांचे गाणे' या कलेची नेमकी सुरुवात कधी झाली याचा ठोस ऐतिहासिक पुरावा आज उपलब्ध नाही. पण अभ्यासकांच्या मते, सुमारे ३०० ते ४०० वर्षांपूर्वी पासून गावोगावी धार्मिक उत्सव, जत्रा आणि सामुदायिक कार्यक्रमांमध्ये पंडवानी कला सादर केली जात असे. अनेक शतकांपासून ग्रामीण भागांत मौखिक परंपरेने पंडवानी जतन केली गेली आहे.

या कलेत मुख्यतः महाभारत मधील पांडवांच्या जीवनातील घटना, पराक्रम, युद्ध आणि नैतिक मूल्ये हे सर्व गीत, संगीत, अभिनय आणि कथाकथनाच्या माध्यमातून सादर केले जाते. पूर्वी महाभारत सर्वसामान्यांना वाचता येत नसल्याने गायक–कथाकारांनी गाणी आणि कथांमधून ते लोकांपर्यंत पोहोचवलं. पंडवानीच्या दोन प्रमुख शैली मानल्या जातात. पहिली 'वेदमती शैली'. यामध्ये कलाकार बसून शांत, पारंपरिक आणि शास्त्रीय पद्धतीने विशेष अभिनय न करता कथा सांगत असतो. तर दुसरी 'कपालिक शैली'. या कलेमध्ये कलाकार उभा राहून गायन, अभिनय, संवाद, हावभाव आणि देहबोली यांचा प्रभावी वापर करून महाभारतातील कथा लोकभाषेत रंगवून सादर करतो. त्याच्या हातात 'एकतारी किंवा तंबुरा' हे वाद्य असतं. आणि यातली गंमत म्हणजे, गोष्टी सांगताना विविध प्रसंगांमध्ये गदा, धनुष्य, तलवार किंवा रथाचे प्रतीक म्हणून हातातील या एकतारीचा वापर तो करतो. त्याला साथ करणारे हार्मोनियम, तबला, ढोलक, मंजीरा व कोरस गायक बरोबर असतात. ही शैली अधिक नाट्यमय आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी असते.

डॉ. तीजन बाई या 'कपालिक शैली'च्या जगप्रसिद्ध कलाकार होत्या. त्यांचा जन्म छत्तीसगडमधील गनियारी (दुर्ग जिल्हा) येथे पारधी समाजात ८ ऑगस्ट १९५६ ला झाला. पंडवानी कलेचा वारसा तीजन बाईंना आजोबा बृजलाल पारधी यांच्याकडून मिळाला. ते पंडवानी गायक होते. वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी तीजन बाईंनी चंद्रखुरी गावात पहिला सार्वजनिक कार्यक्रम केला. बिदागी मिळाली होती १० रुपये ! त्या काळात पंडवानी ही प्रामुख्याने पुरुषांची कला मानली जायची. तरीही तीजन बाईंनी ही परंपरा मोडून दमदार शैलीत उभे राहून कला सादर केली आणि नवा आदर्श निर्माण केला.

कुणावाचून कुणाचे काहीच अडत नाही हे जरी खरे असले,
तरी कोण कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही!

पण स्त्रीने सार्वजनिकरित्या पंडवानी गाणे अयोग्य मानले जात असल्याने त्यांचा बालविवाह झाला असला तरी सासरच्या मंडळीनी आणि समाजाने त्यांना बहिष्कृत केले. एकट्याने झोपडी बांधून राहात संघर्षमय आयुष्य स्वीकारले, पण कला सोडली नाही. या कलेचा प्रचार आणि प्रसार हे आपल्या जीवित कर्तव्य मानून अतिशय निष्ठेनं तीजन बाईनी या कलेला आपलं जीवन वाहून घेतलं होतं. त्यांचं सादरीकरण अत्यंत प्रभावी आणि नाट्यमय असे. हातात तंबूरा (एकतारी) घेऊन त्या महाभारतातील भीम, अर्जुन, द्रौपदी, दुर्योधन यांसारखी पात्रे अभिनयातून जिवंत करत. महाभारतातील कीचकवध, द्रौपदी स्वयंवर, द्यूत आणि द्रौपदी वस्त्रहरण, कुरुक्षेत्र युद्ध, गीता उपदेश असे प्रसंग जिवंत करून प्रेक्षकांच्या मनातील श्रोता त्या जागा करत. धृतराष्ट्राचा आणि दुर्योधनाचा अधर्म, द्रौपदीची असहाय्यता, भीमाचा पराक्रम, कुरुक्षेत्रावरील अर्जुनाचा भांबावलेपणा आणि कृष्णाचा गीता उपदेश लोकांपर्यंत पोहचविताना काय योग्य आणि काय अयोग्य यासाठी बोलताना किंवा गाताना क्षणभर थांबून त्या प्रेक्षकांकडे प्रश्नार्थक नजरेने पहात आणि प्रेक्षक स्वतःशी विचार करू लागत. ही त्यांची कलाकार म्हणून जबरदस्त खासियत होती, त्यांच्या आवाजातील ताकद, संवादफेक आणि भावपूर्ण अभिनय यामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध होत असत.

एकदा प्रख्यात नाट्यदिग्दर्शक हबीब तन्वीर यांनी त्यांची कला पाहून पंतप्रधान इंदिरा गांधींसमोर सादरीकरण करायची संधी दिली. हा त्यांच्या कारकिर्दीतील मोठा टप्पा ठरला. यानंतर त्यांना देशभर ओळख मिळाली. त्यांनी कपालिक शैलीला अभूतपूर्व लोकप्रियता मिळवून दिली आणि पंडवानीला राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवलं. फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, जपान, स्वित्झर्लंड, मॉरिशस यांसह अनेक देशांत भारताचं त्यांनी सांस्कृतिक प्रतिनिधित्व केलं. कलेवरील निष्ठा आणि मेहनतीनं त्या पंडवानी कलेचा जागतिक चेहरा बनल्या. १९८५ च्या पॅरिस मध्ये झालेल्या भारत उत्सवात त्यांचा सहभाग होता. त्या नंतर १९८६ साली भिलाई पोलाद प्रकल्पात सरकारतर्फे मिळालेल्या नोकरी मुळे आर्थिक स्थैर्य आलं. १९८८ मध्ये त्याना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यानंतर, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९५), पद्मभूषण (२००३), पद्मविभूषण (२०१९) आणि संगीत नाटक अकादमी फेलोशिप (२०२३) अशा अनेक पुरस्कारांच्या त्या मानकरी ठरल्या.

डॉ. तीजन बाई यांनी आपल्या आयुष्यात २००हून अधिक शिष्यांना पंडवानी कलेचं प्रशिक्षण दिलं. गुरू तीजन बाई यांची शिकवण्याची पद्धत पारंपरिक होती. त्या शिष्यांना केवळ गाणे शिकवत नसत, तर महाभारतातील प्रसंगांचा भावार्थ, पात्रांचे स्वभाव, संवादातील चढ-उतार, अभिनय, आवाजातील ताकद, देहबोली आणि प्रेक्षकांशी संवाद साधण्याची कला यांचेही मार्गदर्शन करत असत. त्यांच्या मते पंडवानी ही केवळ गायनकला नसून; ती अभिनय, कथाकथन आणि आध्यात्मिक चिंतन यांचा सुंदर संगम असायला हवी. त्यांच्या शिष्यांमध्ये तरुणा साहू, ऋतू वर्मा आणि उषा बारले यांची नावं विशेष उल्लेखनीय आहेत. याशिवाय अनेक ग्रामीण भागांतील कलाकारांना त्यांनी विनामूल्य प्रशिक्षण देऊन पंडवानीची परंपरा पुढे नेली. तीजन बाई यांच्या मते, कला ही पुस्तकातून पूर्णपणे शिकता येत नाही; ती गुरूच्या सहवासातून, सातत्यपूर्ण रियाजातून आणि अनुभवातून आत्मसात करावी लागते. त्यांनी जपलेली गुरू-शिष्य परंपरा भारतीय लोककलेच्या समृद्ध वारशाचे प्रेरणादायी प्रतिक आहे. तीजन बाई यांचं कार्य केवळ एक महान कलाकार म्हणून नव्हे, तर एक आदर्श गुरू म्हणूनही सदैव स्मरणात राहील. दीर्घ आजारानंतर त्यांचं ५ जुलै २०२६ रोजी रायपूर येथे


(पृष्ठ क्र. १३ वर)

# जागतिक वारसास्थळ नामांकित गड-किल्ल्यांचा परिचय
# किल्ले विजयदुर्ग

*युनेस्कोच्या 'जागतिक वारसा स्थळ नामांकित यादी'त स्थान मिळालेला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 'विजयदुर्ग' छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराच्या राजधानीचा गड होता. हा किल्ला त्याच्या तिहेरी तटबंदी आणि भवताल असलेल्या सिंधुसागराच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेसाठी आजही प्रसिद्ध आहे. याच बळावर मराठी आरमाराने इंग्रज, डच, पोर्तुगीज आणि मुस्लीम यांच्या सागरी आक्रमणाचा नुसता प्रतिकारच केला नाही तर त्या सर्वांवर वचक ठेवून मराठ्यांना मस्कत व इतर बाह्य देशांशी मुक्तपणे व्यापार करण्यास संधीसुद्धा निर्माण करून दिली. त्याच विजयदुर्गाची माहिती या लेखात दिलेली आहे. - संपादक*

**किल्ले विजयदुर्ग**

हां..हां म्हणता इ.स. १६५६ चं साल उजाडलं. दिनांक १५ जानेवारीला शिवबाराजेंनी जावळी काबीज केली आणि अकस्मात स्वराज्याची हद्द समुद्रास भिडली. अशातच आदिलशाही पातशहा मेल्यामुळे विजापूरकरांचा उडालेला गोंधळ आणि वडिलांच्या आजारामुळे दक्षिणेत अडकून पडलेल्या शहजादा औरंगजेबाची उडालेली तगमग याचा फायदा उचलत राजे कोंकणातील गिर्ये गावी पोहोचले. राजे समुद्रतीरावर उभे होते. सागर गर्जत किनाऱ्यावर झेपावत होता. किनाऱ्यावर पाचपन्नास तरांडी आणि एक-दोन शिडांच्या नांवा हेलकावत होत्या. राजे भारावून सागराचे विशाल रूप पाहात होते. सूर्याच्या दुपारच्या किरणांत सागराच्या लाटा मोत्यांचा चुरा उधळीत होत्या. त्यांना बघत-बघत राजे किनाऱ्यावर उभ्या असलेल्या गिर्येच्या किल्ल्यात शिरले. यावेळी राजांच्या बरोबर तानाजी, येसाजी, संभाजी, कावजी, अत्रे अशी मंडळी होती. राजे गड फिरत होते. फिरता-फिरता एके ठिकाणी थांबून थांबून राजे अत्रेंना म्हणाले, 'मध्य भारतातील तो धारचा शिलाहार राजा भोज..! खरा जाणता राजा होता तो..! त्याने जाणले गडकोट हेच राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण, गडकोट हेच राज्य..! म्हणूनच इतक्या दूरवर त्याने हा किल्ला बांधला..आता हे मूळचे व्यापारी उद्देशाने बांधलेले ठाणे लष्करी दृष्टीकोनातून आपण पुन्हा नव्याने उभारू..!'.



किल्ले विजयदुर्ग

तातडीने रायरीस असलेल्या हिरोजी इंदूलकरांना गिर्येस पोहोचण्याचा निरोप धाडण्यात आला. ते येताच राजांनी हुकूम सोडला, 'हिरोजी! गिर्येचा गड आपणास नव्याने बांधायचा आहे. गड असा बांधा की, उद्या त्यावर तोफांचे गोळे आदळले तरी गडास भेग पडणार नाही. पुढच्या एकवीस पिढ्यांचा तो तारणहार राहील

असा बांधा. तट, बुरुज, पहारे, कोट, पडकोट, दरवाजे असं सगळं काम चोख असावं. नाजूक जागा असतील, त्या सुरुंग लावून उडवा आणि मजबूत करा. दरवाजे बांधायचे, ते खालील मारा चुकविता येईल, असं वळण देऊन पुढे बुरूज उभे करून आणि येते-जाते मात्र त्यांच्या माऱ्यात येतील, असे असावेत.'

हिरोजींनी मान तुकवली आणि गडबांधणीस सुरुवात केली. बांधकामात मुख्यत्वे वाळा, विड्याची पाने, चुना नारळाचा काथ्या यांचा वापर केला असला तरी महत्त्वाच्या ठिकाणी त्यांनी शिसे उपयोगात आणले. त्यातच गडाचे दगड आणि लाकूड यांची बांधणी ते एकमेकांत गुंफून राहतील, या पद्धतीत केली. त्यामुळे ते निखळून पडतील याची काळजी मिटली. गायमुखी दरवाजा, सत्तावीस बुरूज- त्यापैकी तीन चिलखती, दोन चोर दरवाजे, सात फूट जाडीच्या भिंती आणि छप्पर असलेला दारुखाना, तटबंदीत लपवलेले धान्य-कोठार, सदर, दरबार, राजवाडा, राणीवसा, निशाणीचा बुरूज, पिण्याच्या पाण्याचे तलाव, विहिरी सगळं कसं राजाज्ञेप्रमाणे घडून आलं, अन् मूळचा पाच एकरातील किल्ला आता नव्या रचनेनुसार सतरा एकर एकोणवीस गुंठ्यांचा झाला. किल्ला 'विजय संवत्सरा'त बांधला म्हणून महाराजांनी त्याचे नामकरण 'विजयदुर्ग' असे केले. त्या काळात गड बांधणीचा खर्च अडीच लाख होन आला. हा किल्ला इतका अभेद्य झाला की, आरमारी युद्धात मिळवलेली लूट मराठे या गडावर आणून ठेवत. ३ नोव्हेंबर १६६४ रोजी वेंगुर्ले बंदरात मराठ्यांच्या आरमाराने आदिलशहाची आई बड्या बेगम साहेबीनीचे एक लहान गलबत पकडून किल्ले विजयदुर्गावर ठेवले होते.

अशा या दुर्गास भेट देण्याची संधी अस्मादिकास दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी प्राप्त झाली. विजयदुर्ग किल्ल्यात प्रवेश करतांना सुरुवातीला गडाचे पहिले प्रवेशद्वार म्हणजे 'हणमंत दरवाजा' लागतो. यातून प्रवेश केल्यावर आपणांस मशिदवजा मारुतीचे मंदिर दिसून येते. या हणमंताची स्थापना खाशा शिवरायांनीच केली असा स्थानिकांचा विश्वास आहे. याला लागूनच गोड्या पाण्याची विहीर आहे. विजयदुर्गाच्या रक्षणार्थ महाराजांनी मूळ तटबंदीच्या बाहेर परकोट बांधून काढला आहे. या परकोटात प्रवेश करण्यासाठी जिभीचा छुपा दरवाजा आहे. जिभी म्हणजे लाकडी दरवाजापुढे रचलेली दगडाची तटबंदी. त्यालाच 'हत्तीनख' असेही म्हणतात. तुळाजी आंग्रे यांनी पेशव्यांबरोबर केलेल्या लढाईत याच स्थानी आठ पौंडी तोफा रचून ठेवल्या होत्या. जिभी दरवाज्याच्या उजव्या हातास दर्या दरवाजाचे अवशेष दिसून येतात; तर डाव्या हाताला विजयदुर्गाचे भव्य तट-बुरुज आणि समोर दोन बुलंद बुरुजांच्या बोचक्यात खुबीने लपवलेले गोमुख घाटणीचे मुख्य प्रवेशद्वार दिसते.



**जिभीच्या दरवाजातून मुख्य प्रवेशद्वाराकडे जातांनाचा वळणदार मार्ग**

महादरवाज्याचा मार्ग चक्राकार आहे. मुख्य दरवाजा अस्सल सागवानी पटांचा. त्याला बाहेरून मोठमोठे खिळे ठोकलेले. चक्राकार वळणामुळे शत्रू लाकडी ओंडक्यांचा दुरून पळत येऊन प्रभावी मारा करू शकत नव्हते, तर अणकुची खिळ्यांनी हत्ती धडक देऊ शकत

नव्हते. दरवाजावर नगारखाना बांधलेला आहे. तिथे बसून खाशांच्या वा शत्रूच्या आगमनाची वार्ता विशिष्ट पद्धतीने नगारा, चौघडे अथवा सनई वाजवून बालेकिल्ल्यातील लोकांना द्यायची अशी ही योजना होती. महाद्वारातून सामान्यत: प्रवेश दिंडी दरवाजातून ये-जा होत असे. फक्त महत्त्वाच्या प्रसंगी महाद्वार उघडले जाई. दरवाजातून आंत प्रवेश करताच दोन्ही बाजूंना पहारेकऱ्यांसाठी असलेल्या देवड्या दृष्टीस पडतात. आता गडप्रवेश होताच, समोर एक चौकीचे ठिकाण दिसते. त्यासमोर तीन बांगडी तोफा व कांही तोफगोळे हारीने मांडून ठेवलेले दिसतात. बांगडी तोफांतून उडणारा गोळा स्वतः भोवती गिरक्या घेत नेमक्या ठिकाणी पडतो. त्यामुळे या तोफांचे खास महत्त्व आहे. दरवाजाच्या समोरच तटालगत खलबतखान्याची वास्तू आहे. ती पाहून आपण पायरीमार्गाने वर चढून निशाणीच्या बुरुजावर येऊन पोहोचतो. हा बुरूज बघून आल्या वाटेने माघारी फिरून आपण किल्ल्याच्या आंतील भागाकडे जाऊ लागलो की, दोन इमारती दिसतात. पैकी पहिली इमारत ही सदरेची, तर दुसरी दरबार हॉलची. सदरेवर फडणवीस, चिटणवीस व इतर कारकुन मंडळी बसायची. दरबारात शिरण्यापूर्वी आलेल्या पाहुण्यांची इथे पूर्ण चौकशी व्हायची. दरबाराच्या मुख्य प्रवेशद्वाराला लागूनच खाशांचा मेणा ठेवण्याचा चौथरा आहे. दरबार ८० फूट लांब व ६० फूट रुंद असून, तो दुमजली असल्याच्या खुणा आजही स्पष्ट दिसतात. त्यापैकी खालचा मजला खाशांच्या वापरासाठी, तर वरचा राणीवशाचा उपयोगासाठी. विशेष म्हणजे इथे आजही हळू आवाजात बोललेलं दूरवर स्पष्टपणे ऐकू जाते. इथून बाहेर पडताच समोर लहान मैदान व त्या पलीकडे राजवाड्याचे भग्नावशेष व तेही वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या दोन बाजूंच्या रुपात दिसतात.



**बारातोफा उर्फ खुबलढा बुरूज, दारूकोठार व भुयारात जाणारा मार्ग**

दरवाजापासून उजव्या हाताला लागूनच दारूकोठाराची वास्तू आहे. या कोठाराजवळच तटबंदीत लपवलेले पाच फूट उंच व तेवढेच खोल धान्य-कोठार आहे. या कोठाराजवळच आपणांस तटात एक खाली उतरणारा भुयारी मार्ग दिसून येतो. यातील कातळकोरीव दगडी जिन्याने, पण प्रकाशित मार्गाने आपण सरळ विजयदुर्गच्या पायथ्याशी असलेल्या समुद्रतीरावर येतो. भुयारातून वर आलो की, आता बाजूलाच असलेल्या पायऱ्यांनी वर आलो की, खुबलढा उर्फ बारातोफा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका वैशिष्ट्यपूर्ण लढाऊ पद्धतीची बांधणी असलेल्या बुरुजावर येऊन पोहोचतो. या बुरूजावरून गडाच्या मुख्य प्रवेशद्वारावर लक्ष ठेवता येते. हा बुरूज तटबंदीपासून थोडा पुढे स्वतंत्र बांधून काढलेला आहे. शत्रूला सहजासहजी दरवाजाला लगट करणे शक्य होणार नाही यासाठी महाराजांनी कित्येक क्लृप्त्या दुर्गाची बांधणी करतांना वापरल्या, त्याचे खूबलढा बुरूजाचे बांधकाम एक उत्कृष्ट उदाहरण आहे. खुबलढा बुरूज तीन मजली असून, दुसऱ्या तटबंदीच्या आंत तोफा ठेवण्यात यायच्या. त्यांचे चौथरे आत्ताही स्पष्ट दिसतात. इथे तटबंदीच्या पलीकडे थोडीशी पानथळ आणि दलदलीची जागा आहे. फक्त भरतीत तिथपर्यंत लहान होड्या यायच्या. त्यातून गडास लागणारा भाजीपाला, धान्य यायचे. गोदीच्या अंगाने वाघोटन

खाडी तेथील दगड बारुदीने उडवून देऊन आणखी खोल केलेली आहे. ही गोदी ३५५ फूट लांब, २२७ फूट रुंद अशा मोजमापाची आहे. या गोदीची क्षमता ५०० टनी जहाजांना सामावून घेण्याची होती. विजयदुर्ग गावाच्या अलीकडे सुमारे तीन-साडेतीन कि.मी. अंतरावर ही जागा आहे. त्यात भरतीच्या वेळी लहान माचवे व गलबते आंत घेऊन त्यांच्या नांगरून ठेवण्याची, तसेच दुरुस्तीची व्यवस्था करण्यात येत असे. ओहोटीच्या वेळी हा भाग लाकडी फळ्यांनी बंद करण्यात येई.

आता आपण परत दगडी जिन्याने खाली यायचे. यावेळेस धान्यकोठार आणि बारुदखाना यांच्या मधोमध असलेल्या लहानशा महादेव मंदिराचे दर्शन घ्यायचे. येथील मूर्ती सरखेल कान्होजी आंग्रे यांनी स्थापन केलेली आहे. तसे कान्होजी दक्षिणेस दहा कोस अंतरावरील कुणकेश्वराचे निस्सीम भक्त, पण नित्याने तिथे जाणे अवघड झाल्याने त्यांना झालेल्या दृष्टांतानुरूप हे लहानशे मंदिर बांधून त्यात शिवलिंग स्थापित केले. इथून पुढे किल्ल्यात जाणाऱ्या पायवाटेने चालू लागलो की, उजव्या हातास घोड्यांच्या पागेची जागा येते. या ठिकाणी बाहेरून आलेल्या मंडळींच्या घोड्यांना दाणापाणी आणि पाहुण्यांच्या गुळपाण्याची व्यवस्था व्हायची. इथून थोडे पुढे आलो की, डाव्या हातास तीन मजली उंच इमारत दिसते. तो आहे राणीवसा. त्याच्या लगदच असलेली बावडी विहीर आणि माणूसभर उंचीचे तुळशी-वृंदावन आजही सुस्थितीत आहे. आता आणखी पुढे आलो की, उजव्या हाताला गडावरची मातीची सर्वांत उंच जागा असणारी टेकडी नजरेसमोर येते. शिवकाळात राजांचा भगवा इथे दिमाखात फडकायचा. बाजूलाच भवानी मातेचे लहानसे कौलारू छप्पर असलेले मंदिर आहे. वास्तवात ही महिषासूर मर्दिनीची मूर्ती असून, तिच्या खांद्यावर व बाजूस राक्षसांच्या दोन प्रतिमा स्पष्ट दिसतात. कधीकाळी या मंदिरास गर्भगृह, अर्ध सभामंडप, पूर्ण सभामंडप असावे व ते बरेच मोठे असावे हे बाहेर विखरून पडलेले भग्नावशेष व इतर खुणांवरून सहज लक्षात येते. मंदिराच्या जवळच एक वास्तू असून, तिच्या पुढ्यात 'जखिणीची तोफ' मांडून ठेवली आहे. या तोफेशेजारी शिवाहार (परमार) काळातील काळ्या पाषाणातील चिरेबंदी दुमजली अंबरखाना आहे. विजयदुर्ग इंग्रजांच्या ताब्यात आल्यावर इंग्रजांनी या इमारतीवरच विश्रामगृह थाटले. पण, नंतरच्या सागरी थैमानात ते तग धरू शकले नाही; मात्र बाराव्या शतकातील अंबरखाना आजही दिमाखात उभा आहे. या अंबरखान्यास लागूनच संपूर्ण किल्ल्याची तहान भागवू शकणारा भलामोठा हौद आहे. त्यात उतरणाऱ्या पायऱ्यासुद्धा मोक्याच्या ठिकाणी बांधलेल्या आहेत. इथे जवळच 'साहेबांचे ओटे' नामक स्थान आहे.




**साहेबांचा ओटा**

दिनांक १८ ऑगस्ट १८६८ या दिवशी झालेल्या खग्रास सूर्यग्रहणाचा अभ्यास करण्यासाठी ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ सर नॉर्मन लॉकियर यांनी विजयदुर्ग किल्ल्यावर ओटे बांधून त्यावर दुर्बीण, स्पेक्ट्रोस्कोप आणि इतर साहित्य ठेवले. या साहित्याच्या सहाय्याने त्यांनी सूर्यकिरीटाच्या (करोना) वर्णपटलाचा वेध घेत सूक्ष्म निरीक्षण केले. त्यात त्यांना ५८७.७९ नॅनोमीटर लांबीची पिवळ्या रंगाची रेषा आढळली. अभ्यासाअंती ही रेषा त्याकाळी अज्ञात असलेल्या मूलद्रव्याची असावी

व ते मूलद्रव्य सूर्यावर असल्याच्या निष्कर्षाप्रत ते पोहोचले. लॉकियरने आपली निरीक्षणे, संशोधन व निष्कर्षे ४ सप्टेंबर १८६८ रोजी फ्रेंच खगोल संघटनेस कळविली. या मूलद्रव्यास ते सूर्यावर आढळले असल्याने ग्रीक भाषेतील हेलिऑस म्हणजे सूर्य या अर्थाने 'हेलियम' हे नांव त्यांनी सुचवले. ही विज्ञानेतिहासातील अभूतपूर्व घटना होती. पुढे पंचवीस वर्षांनी विल्यम रामसे या स्कॉटिश शास्त्रज्ञाने या शोधावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे किल्ले विजयदुर्गला 'हेलियमचे पाळणाघर' असेही संबोधण्यात येते. ज्या ओट्यांवर दुर्बीण ठेवून हेलियमचा शोध घेण्यात आला. त्यास 'साहेबांचे ओटे' म्हणून प्रसिद्धी मिळाली.

'पुढच्या एकवीस पिढ्यांचा तो तारणहार राहील..' या शिवबाराजेंच्या मुखातून निघालेल्या शब्दांची प्रचिती पुढे लवकरच आली. शिवबा आणि संभाजीराजेंच्या कालखंडानंतर कान्होजी आंग्रे यांच्याकडे मराठी आरमाराचे आधिपत्य आले. त्यांचे आरमार दर्यावर वचक ठेवून होते. ते बुडविण्यासाठी इंग्रजांनी अथक परिश्रम केले. ते कान्होजींनी हाणून पाडले. जेम्स डग्लस या इंग्रजाने लिहिले आहे, 'आंग्रे हा एखाद्या समुद्रातल्या शार्क माशासारखा, पाण्यातल्या मगरीसारखा वा हवेतील ससाण्यासारखा होता. तो वेगाने पाण्याबाहेर येई तर जमिनीवरून तडफेने सरपटत असे आणि सरपटता-सरपटता जे जे हिरवे दिसेल ते ते गिळंकृत करीत असे.'

इंग्रजांनी विजयदुर्गावर पहिला हल्ला मेजर व्हेन याच्या आधिपत्याखाली दिनांक १५ जून १७१८ रोजी केला. त्यांच्या आरमाराने किल्ल्याच्या तटबंदीच्या पूर्वेकडील टोकापासून ते बंदराच्या बाहेरच्या भागापर्यंत जहाजांची रांग उभी करून वाघोटन खाडी आणि किल्ले विजयदुर्गाचा बाहेर जाण्याचा मार्ग बंद केला. मोठ्या जहाजांमागे लहान जहाजांची अजून एक फळी होती. मराठी आरमारावर हल्ला चढवायला किंवा पाठलाग करायला ती सज्ज होती. इंग्रजी आरमाराने विजयदुर्गावर आणि आंग्रांच्या नांगरलेल्या आरमारावर तोफांचा भडिमार सुरू केला. पण विजयदुर्ग शांत होता. क्वचित बंदुकीच्या फैरी ऐकू येत. इंग्रजांनी आगीचा वर्षाव करणारं जहाज पुढे काढलं. पण, मराठी आरमारानं खाडीच्या तोंडावर लाकडाचे मोठे ओंडके टाकून इंग्रजी आरमाराला आंत येण्यास मज्जाव केला होता. इंग्रजी तोफगोळे नांगरलेल्या मराठी आरमारापर्यंत पोहोचत नव्हते. दोन दिवस इंग्रजी तोफा सतत आग ओकत होत्या, तरी विजयदुर्गावर व मराठी आरमारावर कोणताच परिणाम झाला नाही. त्यातच त्यांची कांही जहाजे दलदलीत अडकली. एक तर अचानक फुटलं. पण ते कां याचं कारण त्यांना सापडलं नाही. शेवटी इंग्रजांनी पायदळ उतरवलं. ते उतरत असतांना विजयदुर्गाहून कोणताच प्रतिकार झाला नाही. जहाजं गोळा करून ठेवलेल्या खाडीपर्यंत हे पायदळ विजयदुर्गाच्या भिंतीजवळून प्रदक्षिणा घालत गेलं, तरीही प्रतिकार झाला नाही. पुढे गेल्यावर इंग्रजी कॅप्टनच्या ध्यानात आलं की, नांगरून ठेवलेल्या मराठी जहाजांवर पोहोचण्याआधी मोठी दलदल आहे. ही दलदल ओलांडून जहाजांना आग लावणे शक्य नसल्याचे कळताच ते माघारी फिरले. आता मात्र किल्ल्यावरून दणदणीत गोळीबार सुरू झाला. अनेक इंग्रज मारले गेले...त्यांची चांगलीच पळापळ झाली. विजयदुर्ग काबीज करणे आणि मराठ्यांचे आरमार बुडवणेही अवघड आहे हे लक्षात आल्यावर १८ जून १७१८ रोजी मराठ्यांकडून चांगलाच मार खाऊन इंग्रजी आरमार मुंबईस परतले. मुंबईच्या गव्हर्नरचा चांगलाच हिरमोड झाला. इंग्रजी काफिल्यात अधिकारी असलेल्या क्लेमंट डाऊनिंगने म्हटले आहे, 'या वेढ्याच्या वेळी किल्ल्यात धड शंभर तरी लोक होते की नाही हा प्रश्न आहे.' विशेष म्हणजे कान्होजी आंग्रे हे स्वतः इंग्रजी चढाईच्या वेळी विजयदुर्गावर नव्हते.


यश मिळवायचं असेल तर स्वत:च स्वत:वर काही बंधनं घाला.

पुढे इंग्रजांनी १७२० साली विजयदुर्गावर परत हल्ला केला. गव्हर्नर चार्ल्स बुनने ॲडमिरल वॉल्टर ब्राऊन याला मोहिमेची सूत्रे देऊन त्याच्या दिमतीस 'लंडन' हे ४० तोफाधारी जहाज, 'चांडोस' हे ४० तोफा सज्ज असलेलं जहाज 'रिव्हेंज'१८ तोफावाले जहाज, प्रत्येकी१६ तोफांचे 'डिफायन्स' व 'पेलहॅम' ही छोटी जहाजे आणि 'टेरिबल' हे बॉम्बफेकी जहाज दिले. तसेच 'फ्राम' हा तरंगता किल्ला दाभोळवरून त्यांच्यात सामील झाले. यावेळी रुद्राजी अनंत हा शांत वृत्तीचा, पण इरादे पक्के असणारा किल्लेदार तैनात होता. इतर जहाजांच्या सहाय्याने 'फ्राम' ला ओढत किल्ल्याजवळ योग्य ठिकाणी तैनात करण्यात आले आणि इशारा मिळताच प्रचंड गडगडाटात तोफगोळे किल्ल्यावर भिरकावल्या गेले. पण कसचे काय?.. त्यातला एकही दुर्गापर्यंत पोहोचला नाही. विजयदुर्गावरील मराठ्यांच्या भडीमारात एक गोळा फ्रामवर आदळून त्याची थोडीफार हानी झाली. नजाकत ओळखून फ्रामला सुरक्षित अंतरापर्यंत मागे घेण्यात आले. दोन दिवस तात्पुरती खटपट करून तिला परत मोर्चावर आणले गेले. दिवस होता २७ सप्टेंबर १७२० चा. पण परत मागच्याच गोष्टीची पुनरावृत्ती झाली. एकही गोळा किल्ल्यावर धडकला नाही. त्यातच किल्ल्यावरून डागलेला एक गोळा फ्रामवरच पडला. फ्राम परत गेली. डागडुजी करण्यात आली. दिवसा अपेक्षित कामगिरी होत नसल्याने रात्रीच्या अंधारात परत एकदा फ्रामचा प्रयोग करण्याचे ठरले. रुद्राजींनी मोठ्या चतुराईने या हल्ल्याचा सामना केला. किल्ल्यावरून डागलेले दोन गोळे फ्रामवर पडले. त्यात कांही सैनिक मेले, तर बरेच जखमी झाले. त्यातच फ्रामवरील एक तोफ तापून फुटली, तर दुसरी तोफ उलटी फिरून त्याचा तोफगोळा एका इंग्लिश जहाजावरच पडला. त्यात अनेक सैनिक होरपळले. भरीसभर 'रिव्हेंज' ही युद्धनौका न दिसणाऱ्या खडकात अडकली. तिला महत्प्रयासानंतर बाहेर काढण्यात यश आले. ॲडमिरल ब्राऊनने विजयदुर्गाचा नाद सोडला व माघारी वळला. इथेही त्याचे नशीब फुटके ठरले. समुद्रीचाच्यांनी या आधी इंग्रजांच्या 'विक्टरी' आणि 'कसांड्रा' अशा लुटून पकडलेल्या दोन जहाजांतून इंग्लिश ताफ्यावर जोरदार हल्ला चढवला. या अकस्मात हल्ल्याने इंग्रज भांबावले, त्यांची फ्राम चाच्यांच्या हाती लागायची शक्यता निर्माण झाली तेंव्हा इंग्रजांनी फ्रामला स्वतःहून पेटवून दिली आणि बघता बघता ती अरबी समुद्रात बुडाली. इंग्रजांचे अतोनात परिश्रम वाया गेले. बरीच धनहानी झाली आणि सरतेशेवटी नामुष्की पदरात पडली.

असाच हल्ला वेंगुर्ल्यांच्या डचांनी इ. स. १७२४ साली केला. त्यांनी प्रत्येकी ४० तोफा असलेल्या सात जहाजांनिशी विजयदुर्गावर चढाई केली. परंतु रुद्राजी अनंत जागरूक होते. त्यांनी डचांचा सपशेल पराभव केला. डचांची कांही जहाजे फुटली. डचांच्या पदरी नामुष्की पडली आणि त्यांना माघार घ्यावी लागली. इकडे जिद्दीने भांडवलेला विजयदुर्ग मोठ्या ताठ मानेनं अन् गर्वानं तसाच उभा राहिला.

या सर्व हल्ल्यांत एक गोष्ट मात्र परकीयांच्या लक्षात येत होती, ती म्हणजे त्यांची जहाजे कशावर तरी आदळून फुटली. गडावरून अथवा आंग्र्यांच्या जहाजांवरून तोफांचा मारा झाला नसतांनाही ही जहाजं फुटून रसातळाला गेली. इंग्रजांना, डचांना व पोर्तुगीजांनाही जहाजं बुडण्याचं कारण माहीत नव्हतं. मराठ्यांना ते कारण माहीत होतं का? ते कळायला मार्ग नाही. याचा उलगडा नुकताच म्हणजे भारताच्या वेस्टर्न नेव्हल कमांड आणि मरीन ऑर्किऑलॉजी या संस्थांनी इ.स.१९८९ आणि १९९५ साली 'ऑपरेशन विजयदुर्ग' राबवून केला. या मोहिमेत त्यांनी ऐन समुद्रात विजयदुर्गाच्या पश्चिमोत्तर बाजूस १५० मीटर अंतरावर दगडावर दगड रचून केलेली ४०० मीटर लांब, ७ फूट रुंद व तळापासून ४ मीटर उंच भिंत शोधून काढली. त्यावर सापडलेले

कोरल व इतर जीव-वनस्पती पाहता ती तीन शतके तरी जुनी असावीत, असे अनुमान काढण्यात आले. भिंतीजवळ जळालेल्या जहाजांचे अवशेष आणि तोफांचे गोळे सुद्धा मिळाले. अशी भिंत बांधण्याची कल्पना शिवबाराजेंशिवाय कुणाची असू शकते?...यामुळे शिवकाळात दुर्ग बांधणीचे शास्त्र किती प्रगत होते याचा अंदाज येतो. पाण्याखाली ही भिंत असल्याने या भिंतीचा मागमूसही नसायचा. पूर्ण ओहोटीच्या वेळीसुद्धा ही भिंत स्पष्टपणे दिसत नाही. त्यामुळे आक्रमण करणाऱ्या बोटींना भिंत न दिसल्यामुळे जलसमाधी मिळायची.




### आंग्रे बॅंक

विजयदुर्ग परिसराची किनारपट्टी व त्या पुढचा समुद्र यांच्यात एक अद्भुत निसर्गाविष्कार साकारला आहे. विजयदुर्गाजवळील समुद्रात सुमारे १०० कि.मी. अंतरावर पाण्याची खोली वाढत-वाढत ८० ते ९० मीटर होत जाते. पुढच्या २-४ कि.मी. अंतरात ती तब्बल १७०-१९० मीटरपर्यंत जाते. त्यानंतर मात्र ती अवघी २० ते २५ मीटर एवढीच भरते. म्हणजे तिथे समुद्राखाली एक उंचवटाच आहे. हा भूभाग तब्बल ३०-४० कि .मी. लांब आणि १५- २० कि.मी. रुंदीचा आहे. समुद्राचा हा वर उजललेला भाग म्हणजेच 'आंग्रे बँक'! सरदार आंग्र्यांनी त्याचा सुज्ञपणे उपयोग केला.

विजयदुर्गाचा आणि तिथल्या मराठी नौदलाचा वचक एवढा प्रभावशाली होता की, तिकडून होणाऱ्या हल्ल्याच्या भीतीने विजयदुर्गाजवळील समुद्री प्रदेशातून जातांना पाश्चिमात्यांच्या जहाजांवरील तोफांची तोंडे विजयदुर्गाकडेच वळलेली असत. या पूर्वाभिमुख तोफांना पश्चिमेकडून सागरी हल्ला झाला, तर परत पश्चिमेकडे तातडीने वळवणे अशक्यच असे. याचाच फायदा या उंचवट्याच्या प्रदेशात नांगर टाकलेले मराठी आरमार घेत असे. एखादं विरुद्ध पक्षाचं जहाज किंवा जहाजांचा काफिला विजयदुर्गाच्या समुद्री भागात आला की, हळूच चाहूल लागू न देता त्या जहाजांना पश्चिमेकडून अटकाव करी. बेसावध मंडळीच्या उडालेल्या तारांबळीचा फायदा घेऊन मराठे ती जहाजे जेर करीत आणि त्यावरील माल ताब्यात घेत.

विजयदुर्गाचं सागरी सामर्थ्य तेथील तिहेरी तटबंदीचा किल्ला, त्याच्याजवळ असलेली छुपी तटबंदी आणि या आंग्रे बँकेत दडलेले आहे. याच बळावर मराठी आरमाराचे लुटारू पाश्चात्त्यांच्या सागरी आक्रमणास यशस्वीरित्या दीर्घकाळ तोंड देऊ शकले. परंतु नियतीस हा सुवर्णयुग पाहावला नाही. दर्यासारंग कान्होजींच्या मृत्यूनंतर (इ.स.१७२९) त्यांचा ज्येष्ठ पुत्र सेखोजी हा (१७२९ ते १७३३) सरखेल झाला. त्याच्या मृत्यूनंतर संभाजी व मानाजी या कान्होजी पुत्रांमध्येच वाद निर्माण झाले. त्याचाच फायदा घेत कनिष्ठ पुत्र तुळाजींनी आपलं बस्तान विजयदुर्गावर मांडलं. त्यांच्या काळात इंग्रजांशी १७३८ साली झालेल्या झटापटीत इंग्रजांना परत एकदा सडकून मार खावा लागला. त्याच साली तुळाजींनी डचांची कांही गलबते पकडली, तर १७४० साली फ्रेंचांचे 'ज्युपिटर' नावाचे लढाऊ जहाज त्याच्या ४० तोफा व ४०० गुलामांसह ताब्यात घेतले. पुढे १७५० साली इंग्रज कमोडोरने ६४ तोफा असलेल्या 'विजीलंट' आणि ५० तोफाधारी 'रुबी' जहाजासह विजयदुर्गावर हल्ला केला; पण तुळाजींनी भिमपराक्रम करत इंग्रजांना धूळ चारली. १७५४ साली तुळाजींनी डचांच्या तीन जहाजांवर हल्ला करून त्यातील दोन समुद्रतळाशी पाठवली; तर एक १८ तोफा असलेले जहाज पकडून

आपल्या आरमारात सामील केले. या विजयामुळे तुळाजींना अधिकच चेव चढला. त्यातून त्यांची मग्रूरी वाढली व ते पेशव्यांचे ऐकेनासे झाले. तेंव्हा हतबल होऊन पेशव्यांनी इंग्रजांशी संगनमत करून समुद्री, तसेच खुष्कीच्या मार्गाने विजयदुर्गावर चढाई केली. १२ फेब्रुवारी १६५६ रोजी इंग्लिश आरमाराच्या भडिमारात आंग्र्यांचे आरमार भस्मसात झाले. तुळाजी कैदेत जखडले गेले. दहा लाख होनांचा मुद्देमाल आणि किल्ल्यावरील २५० तोफा ताब्यात घेऊन रिकामा दुर्ग इंग्रजांनी आठ महिन्यांनंतर पेशव्यांना दिला. थोडक्यात काय तर, स्वकीयांच्या बेबनावातून हा किल्ला परकीयांच्या हाती गेला.

पेशव्यांना चूक उमगली. पण बऱ्याच उशीरा! तेंव्हा त्यांनी आनंदराव धुळप या मोरे वंशीय सरदारास १७७४ साली 'सुभेदार निसबत सुभा आरमार' हा हुद्दा देऊन श्री शिवछत्रपतींच्या आरमारी स्वप्नाची पुन्हा उभारणी करण्यास सांगितले. धुळपांनीही ही जबाबदारी निष्ठेने पार पाडली. आंग्रे यांच्याप्रमाणेच ते 'दरियाचे स्वामी' ठरले. त्यांच्या आरमारी नेतृत्वाची साक्ष देणारे कितीतरी प्रसंग आहेत. त्यातील मोजकेच प्रसंग पुढे उद्धृत करीत आहे. आनंदरावाच्या १७९४ मधील निधनानंतर त्यांचे वारस कृष्णराव धुळप यांच्याकडे विजयदुर्ग आणि मराठी आरमाराची सूत्रे आली. परंतु नंतर १८१८ मध्ये पेशवाई बुडाली. त्याच वर्षी कर्नल इम्लाकने विजयदुर्गाचा ताबा मिळवला आणि त्यासोबतच त्या गडाचा देदीप्यमान इतिहास सिंधुसागराच्या तळाशी बुडाला.

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ–मेल– wandalkardilipgmail.com

●●●

(पृष्ठ क्र.३ वरून – **कवीकुलगुरू कालिदास**)

वाणीला परतत्त्वाचा स्पर्श झाल्यावर जे साहित्य निर्माण होतं ते अक्षर वांङ्मय होय. भारतीय उपखंडाचे समग्र सांस्कृतिक संचित आपल्या लेखणीतून दृग्गोचर करणारा महाकवी कालिदास आपल्याला जगण्याकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टी देतो. विद्वत्ता व सौंदर्यानुभूती, कवित्व आणि रसिकत्व याचा सुंदर मिलाफ म्हणजे कालिदासाचं साहित्य. चराचरामध्ये परमतत्त्वाचा साक्षात्कार करून देणारी कालिदासाची चैतन्यानुभूती पुढच्या पिढ्यांना नेहमीच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहील. आजच्या दिवशी या महाकावीला कृतज्ञ वंदन.

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
सहाय्यक प्राध्यापक
गुजरात केंद्रीय विश्वविद्यालय, वडोदरा
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४
E-mail : dharmadhikari.prashantgmail.com

●●●

**(पृष्ठ क्र. ५ वरून – पद्मविभूषण डॉ. तीजन बाई : पंडवानी लोककलेची जागतिक ओळख)**

निधन झालं. आज लौकिक अर्थाने त्या आपल्यात नाहीत; पण छत्तीसगडच्या भूमीत विकसित झालेली पंडवनी कला ही आज देश–विदेशात केवळ मनोरंजनाची कला न राहता महाभारतातील आदर्श, शौर्य, धर्म आणि नैतिक मूल्ये यांचा सुंदर संगम असलेली भारतीय लोककलेची ओळख बनली आहे ती डॉ. तीजन बाईंच्या योगदानामुळेच !

भारतीय लोककलेच्या या महान कलाकाराला विनम्र श्रद्धांजली !!

**– डॉ. कीर्ती आगाशे**
अध्यक्ष – संस्कार भारती कोकण प्रांत,
ठाणे महानगर

# अणुचाचणीच्या स्थलनिवडीची कहाणी

*पोखरण-२ करता स्थानाची निवड केली त्याचा, निवडप्रक्रियेकरता नियुक्त केलेल्या चमूतील आघाडीच्या सदस्याने लिहिलेला, प्रथम पुरुषी एकवचनी अहवाल- संपादक*

भारताची प्रथम अणुचाचणी १८ मे १९७४ रोजी पोखरण येथे करण्यात आली. सरकारने तिला 'शांततापूर्ण अणुचाचणी स्फोट' म्हटले. पुढे सामान्यतः ती पोखरण-१ अणुचाचणी म्हणूनच ओळखली जाऊ लागली. मधे ७-८ वर्षांचा काळ गेल्यावर १९८१-८२ मध्ये पोखरण-२ अणुचाचणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.



मेजर जनरल मृणाल सुमन

पोखरण-१ पश्चात, चाचणीकरता खड्डा खोदण्याचे काम जोधपूरच्या लष्करी शिबिरातील इंजिनीअरिंग रेजिमेंटला सुपूर्त करण्यात आले. ११३-इंजिनीअरिंग रेजिमेंट नावाची ही रेजिमेंट १९६७ साली निर्माण करण्यात आलेली होती. या रेजिमेंटचा, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि शौर्य यांचा हेवा वाटावा असा इतिहास होता. १९७९ च्या उत्तरार्धात ती जोधपुरात आलेली होती. दिवंगत लेफ्टनंट कर्नल के.सी.धिंग्रा (पुढे जाऊन हे मेजर जनरल पदापर्यंत पोहोचले होते) तिचे नेतृत्व करत होते.



जानेवारी १९८१ मध्ये त्यांना निकडीच्या चर्चेसाठी दिल्लीत बोलावून घेण्यात आले. ते जोधपूरला परतल्यावर, सीमाभागातील कार्यकारी टेहळणीकरता मला त्यांच्या सोबत येण्यास सांगितले. आम्ही दोन जोंगा वाहनांतून निघालो. पहिले वाहन ते स्वतःच चालवत होते. बाजूला मी बसलेलो. सोबतचे लोक दुसऱ्या वाहनात होते. वाटेत ते म्हणाले की, 'रेजिमेंटला १२ फूट व्यासाची आणि ५०० फूटहून अधिक खोलीची विहीर खणायला सांगितले गेले आहे.'

आम्हा दोघांनाही तिचा उद्देश चांगल्या प्रकारे कळलेला होता, मात्र 'आण्विक वा अणुचाचणी' हे शब्द मात्र कधीही उच्चारले गेले नाहीत. वस्तुतः या संपूर्ण कामा दरम्यान तसे वर्गीकरण कुणीही केले नाही.

आम्हाला अंतरातून माहीत होते की, हे काम अवघडच आहे. मात्र त्या आव्हानाचा आवाका आणि आकार आकळला नव्हता. आम्ही नागरी अभियंते होतो आणि खनिकर्म अभियांत्रिकीबाबत आम्हाला फारच थोडी कल्पना होती. वस्तुतः आम्ही कधीही खाणीस भेट दिलेली नव्हती किंवा तसली विहीर बघितलेलीही नव्हती.

इथे अशी विहीर खोदण्याबाबत काही माहिती देणे सयुक्तिक ठरेल. भूमिगत खनिजस्तरापर्यंत पोहोचण्याकरता एक उभी विहीर जमिनीच्या पृष्ठभागापासून, तर खनिजक्षेत्रा-पावेतो खणलेली असते. तिच्यातूनच माणसांची, सामानाची

आणि उपस्करांची ने-आण केली जात असते. निष्कर्षित खनिजही तिच्यावाटेच जमिनीच्या पृष्ठभागाबाहेर काढले जात असते. खनिकर्माबाबतच्या सर्व साहित्यांत अशी विहीर खोदणे सर्वाधिक धोकादायक आणि हानीकारक कर्तव्य मानले जात असते. त्यास विशेष तज्ज्ञता आणि विशेष उपस्करांची आवश्यकता असते.

आमच्या कामाबाबत सांगायचे तर, स्थाननिवडीचे काम रेजिमेंटवर सोपवलेले होते. पोखरण भागाचे नकाशे आमच्या हातात होते. पुढील दोन दिवसांत, जागेच्या विस्ताराची कल्पना यावी म्हणून, त्या पल्ल्यांत आम्ही अनेकदा फिरलेलो होतो. आम्ही नऊ वर्ग किलोमीटर क्षेत्रफळ निश्चित केले, जे महामार्गांपासून आणि गावांपासूनही दूर होते. सुरक्षा आणि गोपनीयतेबाबतच्या आमच्या गरजा त्यामुळे भागत होत्या.

जोधपूरला परतल्यावर कर्नल धिंग्रांनी नवी दिल्लीतील अधिकाऱ्यांना आमच्या स्थाननिवडीची कल्पना दिली. तिकडून मंजुरी मिळताच, मला पोखरणला जाऊन प्रत्यक्ष जागेची निवड करण्यास सांगण्यात आले. कॅप्टन एन.पी.एस. चौहान आणि कॅप्टन डी.के.राजपूत आणि वीस जवानांची फौज माझ्यासोबत होती. सूर्यास्ताला आम्ही त्या ठिकाणी जाऊन पोहोचलो. निवडलेल्या नेमक्या ठिकाणी पोहोचू न शकल्याने आम्ही रात्री तेथेच मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. खेतोलाई-लोहार्की दरम्यानच्या बैलगाडीच्या वाटेवरील ती एक सपाट जागा होती. एक १८० पौंडाचा तंबू तीन अधिकाऱ्यांकरता लगेचच उभारला गेला. जवान मात्र ३-टन वाहनातच झोपले.

डोळे मिटण्यापूर्वी दुसऱ्या दिवशीच्या कृतीबाबत आम्ही मिणमिणत्या कंदिलाच्या प्रकाशात चर्चा करत होतो. तेवढ्यात कॅप्टन राजपूत ओरडले ‘साप’. आम्ही खाली पाहिले. त्या जागी अनेक साप आणि विंचू सरपटतांना पाहून आमची भीतीने गाळणच उडाली. फुरसं होती ती. हे उघडच होते की, आम्ही त्यांच्या घरात शिरलेलो होतो. शूरवीराच्या काळजातही धडकी भरवणारे दृश्य होते ते. रात्रभर आम्ही आपापल्या कॅम्पकॉटांवरून उतरण्याचे धाडस केले नाही. लघुशंकेचा दाब वाढला तरीही नाही.

दुसऱ्या दिवशी पहिले काम आम्ही कुठले केले असेल तर ते पर्यायी शिबिर थाटण्याचे. मात्र संपूर्ण कामादरम्यानच आम्हाला या फुरशांचाच सामना करावा लागणार आहे याची मात्र आम्हाला तेव्हा कल्पना आलेली नव्हती.

फुरसं हा एक सर्वांत धोकादायक साप असतो. अन्य सर्व सापांमुळे होणाऱ्या जीवहानीहूनही फुरशांमुळे होणारी जीवहानी जास्त असते. ते सूक्ष्मपणे वावरत असल्याने, स्थानिक लोक त्यांना कुजबुजत्या आवाजात ‘चोर’ म्हणतात. आमच्याकडेही सर्पदंशाची अनेक प्रकरणे झाली. मात्र सर्व बाधितांना आमच्या कॅप्टन व्ही. के. शुक्ला या रेजिमेंटल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वेळीच सर्पविषविरोधी इंजेक्शन देऊन वाचवलेले होते.

स्थाननिवडीकरता संपूर्ण नऊ वर्ग किलोमीटरचा भाग आम्ही अनेकदा पालथा घातला. पण उपयोग झाला नाही. आम्हाला माहीत होते की, स्थान हे वाळूच्या टेकड्यांमधील सपाट जागीच हवे आहे, फारसे वाळूचे ढिगारे नको आहेत, शिबिराकरता पुरेशी सपाटी हवी आहे. पोखरण-१ च्या वेळी भूजलस्रोतांमुळे अनेकदा आम्हाला माघार घ्यावी लागलेली होती. भूजलस्रोतांचा आढळ कमीतकमी असेल असे ठिकाण हवे होते. मात्र असे ठिकाण कसे शोधायचे याची मात्र आम्हाला काहीच कल्पना नव्हती.

आम्ही खेतोली आणि लोहार्की गावातील स्थानिकांना भेटायचे ठरवले. भूजलस्रोतांच्या आढळाबाबतचे त्यांचे ज्ञान आम्हाला हवे होते. आम्ही त्यांना सांगितले की, आम्हाला तिथे एक कायमस्वरूपी शिबिर उभारायचे आहे. भूजलस्रोतांचा आढळ असेल असे ठिकाण हवे आहे. ते मदतीस तत्पर होते. त्यांनी पाण्याकरता प्रयत्न करून सोडून दिलेल्या अनेक जागा आम्हाला दाखवल्या.

आम्हाला ती ठिकाणे टाळायला सांगितली. 'बोराची झाडे पाहा, मुंग्यांची वारुळे पाहा, तशा ठिकाणी सामान्यतः जमिनीतील पाणी मिळू शकेल', ते म्हणाले.

दुसऱ्या दिवस अखेर, आमची काहीच प्रगती झालेली नव्हती. मात्र आज सरपटणारे सोबती नसल्याने रात्र शांततेत गेली. तिसरे दिवशी सकाळी, आम्ही सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड आणि राजस्थान ग्राऊंड वॉटर खात्यातील तज्ज्ञांचा सल्ला घेण्याकरता जैसलमेर आणि पोखरण शहरांना भेटी दिल्या. भूजलप्रवाह नकाशांचे आधारे त्यांनी पोखरण क्षेत्राचे स्पष्टीकरण दिले. पोखरण निम्न जुराझिक लाठी संरचनेचा भाग असल्याचे सांगितले. तळाशी वर येणाऱ्या ग्रॅनाईटच्या खडकांनी ते व्याप्त होते. त्यात मध्यम ते ठळक दाण्यांचे वालुकाश्म होते, पातळ खडक होते आणि मिश्र राशीही होत्या.

मुख्य पाणीधारक खडक संरचना अनिर्बंधित अथवा बंदिस्त असू शकतात. हवामानाने झिजलेल्या खडकांच्या फटींत असू शकतात. अभेद्य ग्रॅनाईटच्या १२०० फूट खोलातील स्तरांतही असू शकतात. प्रादेशिक भूजलस्तराच्या वरील भागांतही असू शकतात. मात्र आम्हाला ५०० फुटांपर्यंतच जायचे असल्याने आम्हाला या माहितीचा फारसा उपयोग नव्हता.

मग आम्ही सेंट्रल ॲरीड झोन रिसर्च इन्स्टिट्यूट जोधपूर येथेही जाण्याचा निर्णय घेतला. मात्र भूजलस्तराच्या वरील भागांचे आणि भूजलप्रवाहांचे भाकीत करणे अशक्यप्राय असल्याचे त्यांनी सांगितल्याने. आमची निराशाच झाली. त्यांनी भूगर्भशास्त्रीय आणि क्षेत्रीय माहिती पुरवली. आम्ही त्यांची माहिती तपशीलाने अभ्यासली, पण निर्णयकारक निष्कर्षांप्रत पोहोचता आले नाही. खननकार्य सुरू करण्यासाठी स्थलनिश्चिती करणे कठीणच भासत होते. नवी दिल्लीकडूनचा दबाव वाढतच होता. कर्नल धिंग्रांनी स्थलनिश्चिती सत्वर व्हावी म्हणून, आम्हाला पुन्हा पोखरणला भेट देण्यास सांगितले.

निरनिराळ्या मार्गांनी मिळालेल्या माहितीसहित आम्ही पुन्हा तपशीलवार शोध घेतला आणि (अ, ब, क आणि ड) अशी चार ठिकाणे निवडून काढली. त्यांचे आपापसांतील अंतर ९०० ते १४०० मीटर होते. वालुका टेकड्यांच्या मधला कडक पृष्ठभागाचा तो सपाट भाग होता. उपस्कर आणि अन्य पायाभूत सुविधा उभारण्याकरता पुरेशी जागा होती. वाळूच्या टेकड्या जवळच असणे गरजेचे होते. कारण उकरलेली माती दडपायला त्या उपयोगी ठरणार होत्या. एरवी निरीक्षक उपग्रहांच्या नजरेतून आमची हालचाल सुटली नसती.

आम्ही मग गावकऱ्यांना निश्चित केलेल्या ठिकाणांवर पाणी आढळण्याबाबत पुन्हा एकदा विचारले. हितचिंतक ज्येष्ठ गावकऱ्यांनी स्थानिक पानाड्यांची मदत घेण्याचा सल्ला दिला.

भूजलाचा जमिनीवरून शोध घेणाऱ्यांचा उपयोग, सिनाईच्या वाळवंटात ख्रिस्तपूर्व १२५० वर्षे इतक्या आधी मोझेसने केलेला होता. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रातील विचलने भूजल अस्तित्व प्रदर्शित करतात या समजुतीवर हे आधारलेले होते. पानाड्याचे शरीर विद्युत वाहक ठरते. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रातून चालतांना ते छोटी विभवांतरे निर्माण करते.

काही पानाडे गुल्लेरच्या आकाराच्या काड्याच वापरत. इतर काही एल आकाराच्या लोखंडी सळ्या वापरत. हातातील त्यांच्या हालचालींवरून ते भाकीत करत असत. ही पद्धत पूर्णतः संवेदनावरच आधारलेली आहे. पानाडे पाण्याची खोली, साठ्याचे प्रमाण यांबाबत किंवा ते असण्याबाबत वा नसण्याबाबतही कोणतीच शाश्वती देऊ शकत नाहीत. आम्हाला ही कल्पना सुरस वाटली; मात्र अवैज्ञानिक म्हणून आम्ही ती सोडून दिली.

नंतरच्या दिवशी संध्याकाळी आम्हाला न सांगताच खेतोलाई गावातील प्रमुख, पोखरण शहरातून एका पानाड्याला घेऊन आला आणि त्याला त्याने निवडलेल्या ठिकाणांवर शोध घेण्यास सांगितले. ती पौर्णिमेची रात्र

काय चुकलं हे शोधणारे आयुष्यात पुढे जातात, कुणाचं चुकलं हे शोधणारे तिथेच राहतात!

होती. नुकतीच तोडून आणलेली गुल्लेराकृती बोराच्या झाडाची काडी आपल्या पिशवीतून काढून, पाण्याने धुऊन मंत्र पुटपुटले. आम्हा सगळ्यांकरता तो अनुभव भारून टाकणाराच होता. तरीही ही चारही ठिकाणे पाण्याकरता उपयोगाची नाहीत असे त्याने सांगताच आम्ही सगळ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. कोणत्याही वैज्ञानिक आधाराविना अपेक्षित उत्तर मिळाल्याने समाधान वाटून आम्ही सुखावलो. अणुचाचणीकरता पानाड्याचे प्रमाणही कामी आले हे सांगणे असंबद्ध वाटते! खरोखरीच एक अप्रशस्त प्रमाण होते ते.

पोखरण-१ च्या वेळेला खोदकाम सुरू झाल्यानंतर तीन महिन्यांतच त्यात पाणी शिरल्याने ती विहीर सोडून द्यावी लागलेली होती आणि कोरडी म्हणून सोडून दिलेली एक विहीरच चाचणीकरता तयार करावी लागलेली होती. पोखरण-२ करता प्रस्तावित विहीर किमान ५०० फूट खोल असणे अपेक्षित होते. कोणतीही सोडून दिलेली विहीर इतकी खोल असणार नव्हती. कारण त्या १२० फूटांहून जास्त खोल क्वचितच असत. अनपेक्षित अडचणी गृहित धरून, अधिकाऱ्यांनी एकाच वेळी दोन ठिकाणी विहिरी खोदायचा निर्णय घेतला. त्यामुळे निवडलेल्या चार ठिकाणांपैकी दोन जागा आम्ही निवडल्या. त्याकरता खूप विचार केला तरीही शंका येतच राहिल्या.

गोपनीयता राहील का ही भीती असूनही कर्नल धिंग्रा यांनी, स्थानिक भूजलप्रवाह अडतींचा विहिरीस पाणी लागण्याबाबतच्या अनुभवाविषयी सल्ला घेण्याचे ठरवले. अडतीलाही तीच कहाणी ऐकवली गेली की, लष्कराला भूजलस्रोतासहितची जागा कायमस्वरूपी शिबिराकरता हवी आहे. नमुन्यांकरता अडतीने भूगर्भवेधन केले. १५० फुटांपर्यंतचे नमुने ते काढू शकले. त्या चारही ठिकाणी विहीर खोदणे व्यर्थ आहे असाच अहवाल त्यांनी दिला. म्हणजे वापरण्यालायक परिमाणात पाणी असणार नव्हते. आमच्या निष्कर्षांची पुष्टी करणाराच अहवाल होता. मात्र निर्णायक नव्हता. कारण संवेदित खोली केवळ १५० फूटच होती.

अखेरचा उपाय म्हणून आम्ही भूमिगत जलसाठ्यांच्या शोधाकरता सरकारी अडतींची मदत घेण्याचा निर्णय घेतला. त्यांची पद्धत भूभौतिक होती. वीजवहनाचे आधारे जमिनीची वाहकता मोजून ते निर्णय करत असत. ठिकठिकाणी विद्युताग्रे लावून थेट प्रवाह त्यात प्रवाहित करून ते मापने घेत असत. खोली, आकार आणि साठा यांवर अवलंबून निदाने करत. उपस्कराची कार्यक्षमता लक्षात घेता त्या पद्धतीने २०० फुटांहून खोल ठिकाणी अनुमान करता येणारच नव्हते. त्यामुळे हे निष्कर्षही निर्णायक ठरले नाहीत.

सर्व माहितीच्या विश्लेषणाकरता कर्नल धिंग्रांनी अनेक बैठका घेतल्या. कष्टपूर्वक स्थलतुलना केली गेली. अ आणि क ही ठिकाणे पसंतीची म्हणून निवडली गेली. हे कबूल केलेच पाहिजे की, अंतीम निवडीत म्हणतात तसा सहाव्या इंद्रियाचा उपयोगही झालाच. मग कर्नल धिंग्रा आणि मी या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी पोखरणला निघालो. अंतीमतः निवडलेली ठिकाणे, नवी दिल्लीला, नकाशावर खूण करून पाठविली गेली.

आम्ही 'अ' ठिकाणी पोहोचेपर्यंत सूर्य अस्ताला जात होता. प्रस्तावित विहिरीचे केंद्र स्थानावर निश्चित करायचे होते. मी कर्नल धिंग्रांना विनंती केली की, त्यांनीच त्या ठिकाणी खुंटी ठोकावी. एका शिपायाने त्या जागी खुंटी धरून उभी केली. धिंग्रांपाशी हातोडा दिला. ते पुढे झाले. आम्ही सारेच त्यांच्याभोवती वर्तुळात उभे होतो.

तो क्षणच ऐतिहासिक होता. सूर्यकिरणे वाळूच्या टेकड्यांना सोनेरी रंगाच्या निरनिराळ्या छटांत चमकवत होती. मोठा रम्य प्रसंग होता तो. एकाकी वाळवंटातील शांतता वातावरणास आणखी भारावून टाकत होती. कर्नल धिंग्रा सूर्याकडे तोंड करून उभे होते. एक मिनिटभर

त्यांनी डोळे मिटले. बहुधा जगन्नियंत्याचे आशीर्वादच घेतले. प्रसंगाच्या गांभीर्याने आम्हा साऱ्यांवरच गारूड केलेले होते. आम्ही सारेच निस्तब्ध झालेलो होतो. हातोडीच्या ठोक्यानेच ती स्तब्धता लोप पावली.

अंधार पडत होता. आम्ही घाईनेच 'क' स्थळाप्रत निघालो. ते ९०० मीटर दूर होते. तीच प्रक्रिया अवलंबिली गेली. मात्र कर्नल धिंग्रांनी खुंटी ठोकायला मला बोलावले. हा त्यांचा उदार दृष्टिकोन होता. परतीच्या लांबलचक जोधपूर रस्त्यात आम्ही क्वचितच काही बोललो असू. फासा पडलेला होता. भारताच्या आण्विक आशेचे भवितव्य आमच्या निवडीवर अवलंबून होते. या विचाराने आम्हाला भारून टाकलेले होते.

मंजुरी मिळताच काम धडाक्यात सुरू झाले. वाळूचे ढिगारे दूर सारून आम्हाला मिश्र खडक लागला. वालुकाश्म आणि गाळाचा. ६० फुटावरच पाणी झिरपू लागले. खोली गाठणे अवघड होऊ लागले. मात्र आमचे इरादे बुलंद होते. ९०-१०० फुटांवर तर पाणी एवढे झिरपू लागले की, विंधन अशक्य झाले. थांबलेच.

मात्र ११३-इंजिनीअरिंग रेजिमेंटच्या दुर्दम्य इच्छाशक्ती आणि नवोन्मेषशाली पद्धतीने साऱ्या अडचणींवर मात केली. म्हणतात ना 'इतिहास तेच रचतात जे प्रभावी ठरतात'. आम्ही पाण्याच्या झिरप्यावर कशी मात केली, ते पुन्हा कधीतरी सांगण्याकरता राखून ठेवू.

मूळ इंग्रजी लेखकः मेजर जनरल मृणाल सुमन

मराठी अनुवादः नरेंद्र गोळे

**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

(मुखपृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

१९७५ पासून या कामाला गती आली. श्री निरंजन घाटे, डॉ. बाळ फोंडके, प्रा. जयंत नारळीकर, श्री लक्ष्मण लोंढे, श्री सुबोध जावडेकर यांनी विज्ञान कथा लिहून या कार्याला हातभार लावला.

इतर साहित्याच्या तुलनेत विज्ञान साहित्याकडे जास्त मूलभूत पातळीवर जीवनदर्शन घडवण्याची क्षमता असते. मराठी विज्ञानकथेने गेल्या पन्नास-साठ वर्षांत गाठलेला पल्ला प्रशंसनीय आहे. आणि आता पुढे तशीच वाटचाल कायम चालू राहील असे आशादायी लिखाण होत आहे. आजच्या घडीला 'विज्ञान-कथा' हा प्रकार मराठी साहित्यात चांगलाच रूळला आहे. अनेक नवनवीन लेखक हा मार्ग चोखाळत आहेत.

विज्ञान कथा सांगणे हे माझे आवडीचे काम आहे. यात मी काल्पनिक कथेपेक्षा सत्यकथेला जास्त महत्त्व देतो. प्रसिद्ध शास्त्रज्ञांच्या जीवनात घडलेल्या घटनावर आधारित या कथा असतात. यातून दोन बाबी साधण्याचा माझा प्रयत्न असतो. एकतर शास्त्रज्ञांचे प्रेरणादायी जीवन विद्यार्थ्यांपुढे मांडणे आणि दुसरे म्हणजे, शास्त्रज्ञांनी संशोधनासाठी स्वीकारलेला वैज्ञानिक मार्ग. मागील पाच दशकांत मी वेगवेगळ्या शाळा आणि महाविद्यालयांतून अनेक कथा सांगितल्या आहेत. माझ्या या प्रयत्नांना चांगले यश मिळाले. कथेच्या रूपात मांडलेले विज्ञान विद्यार्थ्यांना खूप आवडते असा माझा अनुभव आहे. म्हणूनच हा मार्ग विज्ञान प्रसारकांनी मोठ्या प्रमाणावर स्वीकारावा असे मी आवाहन करू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

जास्त विचार करत बसलं की कृती करण्याची संभावना खूप कमी होऊन जाते.

# समुद्राखाली भारताचा 'सोनार सापळा'!


*आंतरराष्ट्रीय स्तराविषयी चीन इ. देशांबाबत डोळ्यांत तेल घालून किती खबरदारी घ्यावी याबाबत या लेखातून कल्पना येते - संपादक*

चीनची मलाक्का कोंडी आणि अंदमान-सबांग बंदराचा तो अभेद्य चक्रव्यूह!

हजारो किलोमीटर दूर असलेल्या अथांग महासागरात भारताने एक असा मास्टरस्ट्रोक खेळला आहे, ज्याने जगातील सर्वांत मोठ्या महासत्तांना विचार करायला भाग पाडले आहे. हिंद आणि प्रशांत महासागराच्या लाटांवर सध्या भारताच्या नावाचा डंका वाजतोय आणि संपूर्ण जगाचे राजकारण वेगाने बदलू लागले आहे.

सध्या इंडो-पॅसिफिक हा शब्द टीव्ही आणि वृत्तपत्रांमध्ये सतत ऐकायला मिळतो. हा इंडो-पॅसिफिक म्हणजे नेमके काय, तर आपला हिंद महासागर आणि विशाल प्रशांत महासागर जिथे एकत्र येतात, तो संपूर्ण विस्तीर्ण सागरी प्रदेश. जगातील निम्म्याहून अधिक व्यापार याच सागरी मार्गावरून होतो. साहजिकच, ज्याचे या समुद्रावर नियंत्रण, तो जगात सर्वांत शक्तिशाली मानला जातो.

या समुद्रात गेल्या काही वर्षांत चीनने आपली दादागिरी सुरू केली होती. चीनला वाटत होते की, तो या संपूर्ण सागरी क्षेत्रावर कब्जा करेल आणि भारताला कोपऱ्यात ढकलून देईल. यासाठी चीनने भारताच्या भोवती आपल्या बंदरांचा आणि लष्करी तळांचा एक वेढा तयार केला होता, ज्याला जागतिक राजकारणात 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' (String of Pearls) म्हणजेच 'मोत्यांची माळ' असे म्हटले जाते. पाकिस्तानचे ग्वादर बंदर, श्रीलंकेचे हंबनटोटा बंदर आणि म्यानमारमधील कोको बेट या ठिकाणी पाय रोवून चीन भारताची सागरी नाकेबंदी करण्याचा प्रयत्न करत होता.




पण भारताने या 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स'ला अत्यंत चोख आणि आक्रमक उत्तर दिले आहे. भारताने चीनच्या या मोत्यांच्या माळेला तोडण्यासाठी स्वतःची एक 'नेकलेस ऑफ डायमंड्स' (Necklace of Diamonds) म्हणजेच 'हिऱ्यांचा हार' ही रणनीती आखली. चीनने भारताला वेढायचा प्रयत्न केला, तर भारताने थेट

माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात. एक म्हणजे वाचलेली पुस्तकं आणि दुसरी भेटलेली माणसं!

चीनच्या संपूर्ण सागरी क्षेत्राला आणि त्याच्या व्यापारी मार्गांनाच आपल्या प्रभावाने वेढून टाकले आहे.

या रणनीतीचा सर्वांत महत्त्वाचा पाया म्हणजे भारताचा अंतर्गत 'सागरमाला प्रकल्प' (Sagarmala Project). या प्रकल्पांतर्गत भारत आपल्या तब्बल ७,५०० किलोमीटर लांबीच्या मुख्य सागरी किनाऱ्याचा कायापालट करत आहे. भारताची सर्व प्रमुख बंदरे आधुनिक केली जात आहेत, त्यांना रेल्वे आणि रस्त्यांनी जोडले जात आहे आणि किनारपट्टीवर प्रचंड औद्योगिक कॉरिडॉर उभारले जात आहेत. यामुळे भारताची सागरी मालवाहतूक कमालीची वेगवान आणि स्वस्त झाली आहे. हा सागरमाला प्रकल्प केवळ देशांतर्गत व्यापारासाठी नाही, तर हिंद महासागरात भारताची नौदल शक्ती तातडीने तैनात करण्यासाठी एक भक्कम पाया ठरला आहे.

या अंतर्गत शक्तीला आता भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर जोडले आहे. भारताने केवळ स्वतःच्या देशात बंदरे उभारली नाहीत, तर हिंद महासागरातील आणि त्याच्या आसपासच्या मित्रराष्ट्रांमध्ये सामरिक बंदरे विकसित करून चीनची कोंडी केली आहे. इराणमधील चाबहार बंदर विकसित करून भारताने पाकिस्तान आणि चीनच्या ग्वादर बंदराला शह दिला आहे. तसेच ओमानमधील दुक्म (Duqm) बंदर, मॉरिशसमधील अगालेगा बेट आणि सेशेल्समधील अझम्प्शन बेट येथे भारताने आपले लष्करी आणि नौदलाचे तळ अधिकृतपणे मजबूत केले आहेत. या सर्व देशांशी भारताचे संबंध आज इतके दृढ झाले आहेत की, संकटसमयी भारतीय नौदल या बंदरांचा वापर करून संपूर्ण क्षेत्रावर नियंत्रण ठेवू शकते.

या संपूर्ण भू-राजकारणाचा दुसरा सर्वांत मोठा केंद्रबिंदू म्हणजे 'मलाक्का सामुद्रधुनी' (Strait of Malacca). नकाशावर पाहिले तर हा सुमात्रा बेट आणि मलय द्वीपकल्पाच्या मधला अत्यंत अरुंद सागरी मार्ग आहे. हा मार्ग चीनसाठी किती महत्त्वाचा आहे, हे समजून घेतले पाहिजे. चीनचा सुमारे ७० ते ८० टक्के कच्च्या तेलाचा पुरवठा आणि प्रचंड आंतरराष्ट्रीय व्यापार याच चिंचोळ्या मार्गातून होतो.

जर कधी आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आणि हा मार्ग बंद झाला, तर चीनची संपूर्ण अर्थव्यवस्था एका झटक्यात कोलमडून पडेल. चीनला नेहमीच ही भीती सतावत असते, ज्याला जागतिक राजकारणात चीनची 'मलाक्का कोंडी' (Malacca Dilemma) म्हटले जाते. हा चीनचा सर्वांत नाजूक बिंदू आहे आणि भारताने नेमकी याच जागेवर आपली पकड मजबूत केली आहे.

चीनच्या या मलाक्का कोंडीचा फायदा घेण्यासाठी भारताने आपल्या अंदमान आणि निकोबार बेटांचा वेगाने विकास करण्यास सुरुवात केली आहे. अंदमान आणि निकोबार बेटे ही भारतासाठी केवळ पर्यटन स्थळे नाहीत, तर तो हिंद महासागरातील भारताचा एक जिवंत आणि अभेद्य लष्करी तळ आहे, जो थेट मलाक्का सामुद्रधुनीच्या तोंडावर बसला आहे.

भारत आता या बेटांवर आपली तिन्ही दले- नौदल, वायू दल आणि लष्कर यांची ताकद वेगाने वाढवत आहे. येथील लष्करी धावपट्ट्या मोठ्या केल्या जात असून अत्याधुनिक रडार यंत्रणा आणि क्षेपणास्त्रे तैनात केली जात आहेत. यामुळे मलाक्का सामुद्रधुनीतून बाहेर पडणाऱ्या कोणत्याही जहाजावर अंदमानमधून थेट लक्ष ठेवणे भारताला सहज शक्य झाले आहे.

या अंदमान बेटांच्या सामरिक विकासात एका महत्त्वाच्या शेजारी देशाने प्रचंड स्वारस्य दाखवले आहे आणि तो देश म्हणजे इंडोनेशिया. इंडोनेशिया आणि भारताचे भौगोलिक स्थान एकमेकांना पूरक आहे. भारताने

---

पंगत चुकली तर एकवेळेचं जेवण चुकेल. पण संगत चुकली तर अख्ख्या आयुष्याची दिशाच चुकेल!
म्हणून संगत ही नेहमी चांगल्याचीच करावी.

इंडोनेशियासोबत संरक्षण करार करत भारताची जगातील सर्वात वेगवान सुपरसोनिक क्रूझ मिसाइल ब्रह्मोस आणि अत्याधुनिक अस्त्र क्षेपणास्त्र देण्याचा निर्णय घेतला आहे.

पण सर्वांत मोठी घडामोड म्हणजे इंडोनेशियाने त्यांच्या सामरिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील असलेल्या 'सबांग बंदराच्या' (Sabang Port) विकासाचे काम थेट भारताकडे सोपवले आहे. हे सबांग बंदर नेमके कुठे आहे, तर हे थेट मलाक्का सामुद्रधुनीच्या अगदी प्रवेशद्वारावर आहे आणि भारताच्या अंदमान निकोबार बेटांपासून ते अवघ्या ९० सागरी मैलांवर आहे.

जेव्हा भारताचे अंदमान निकोबार बेट आणि इंडोनेशियाचे सबांग बंदर हे दोन्ही एकत्र येतात, तेव्हा सागरी क्षेत्राचे संपूर्ण चित्रच बदलून जाते. हा एक असा शक्तिशाली जोडगोळा आहे, जो मलाक्का सामुद्रधुनीच्या तोंडावर एक पोलादी दरवाजा तयार करतो. अंदमान आणि सबांग या दोन्ही ठिकाणांवरून भारत आता मलाक्का सामुद्रधुनीतून जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येक चिनी जहाजावर चोवीस तास बारीक नजर ठेवू शकतो.

चीनच्या या मुख्य आर्थिक जीवनवाहिनीच्या नाकावरच भारताने इंडोनेशियाच्या मदतीने आपले हक्काचे ठाणे मांडले आहे. यामुळे चिनी संरक्षण वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे, कारण हा थेट त्यांच्या गळ्याला नख लावणारा निर्णय ठरला आहे.

या संपूर्ण रणनीतीचा दुसरा मोठा टप्पा ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या सहकार्याने पूर्ण होत आहे. ऑस्ट्रेलियासोबत भारताने ऊर्जा सुरक्षा, अंतराळ क्षेत्र आणि खनिजांच्या पुरवठ्याबाबत अत्यंत महत्त्वाचे करार केले आहेत. भारताच्या गगनयान मोहिमेला ऑस्ट्रेलिया पूर्ण सहकार्य करणार आहे. तसेच, भारताला आता ऑस्ट्रेलियाकडून नियमित युरेनियम आणि अतिशय महत्त्वाची दुर्मीळ खनिजे (Critical Minerals) मिळणार आहेत, ज्यावर आतापर्यंत चीनची मक्तेदारी होती.

पण या करारात एक अतिशय महत्त्वाचा आणि गेम-चेंजर संरक्षण करार दडला आहे, ज्याने चीनच्या नौदलाची झोप उडवून दिली आहे. ऑस्ट्रेलियाने त्यांचे समुद्रतळ (Ocean Floor) आणि सागरी पायाभूत सुविधा वापरण्याची अधिकृत परवानगी भारताला दिली आहे.

याचा अर्थ असा की, भारताची नौदलाची जहाजे, विमाने आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारताचे 'सोनार' (Sonar) आणि पाणबुडी विरोधी शोध यंत्रणा आता ऑस्ट्रेलियाच्या विस्तीर्ण सागरी क्षेत्रात तैनात होऊ शकतात. या परवानगीमुळे संपूर्ण हिंद महासागराच्या आणि प्रशांत महासागराच्या रचनेत भारताला प्रचंड मोठी ताकद मिळाली आहे.




गेल्या काही वर्षांत चीनच्या अणुकृत पाणबुड्या हिंद महासागरात चोरून प्रवेश करत आहेत आणि भारताच्या सुरक्षेला आव्हान देण्याचा प्रयत्न

यश मिळाल्यामुळे आपली ओळख लोकांना होते आणि अपयशाने लोकांची ओळख आपल्याला होते!

करत आहेत. पण आता भारताने ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशियासोबत मिळून एक असा अभेद्य साखळी सापळा रचला आहे, ज्याला छेद देणे चिनी पाणबुड्यांना अशक्य होईल.

समुद्राच्या खाली चिनी पाणबुड्यांना यायचे असेल, तर त्यांना काही विशिष्ट सागरी मार्ग किंवा खोल पाण्याचे कॉरिडॉर वापरावे लागतात. आता ऑस्ट्रेलियाच्या समुद्रतळाचा वापर करण्याच्या परवानगीमुळे आणि अंदमान-सबांगच्या अभेद्य तटबंदीमुळे, भारत समुद्राच्या शेकडो मीटर खाली असलेल्या चिनी पाणबुड्यांनाही अचूकपणे टिपू शकतो. चिनी पाणबुड्यांनी हिंद महासागरात पाऊल ठेवले की, भारताच्या आधुनिक सोनार यंत्रणेला त्याची त्वरित माहिती मिळेल आणि त्यांची गुप्तता नष्ट होईल.

चिनी पाणबुड्यांसाठी हिंद महासागराचे दरवाजे आता कायमचे कुलूप लावून बंद करण्यात आले आहेत. समुद्राच्या वर अंदमान आणि सबांगची नजर असेल, तर समुद्राच्या खाली ऑस्ट्रेलियाच्या समुद्रतळाचा वापर करून भारत चिनी नौदलाची संपूर्ण कोंडी करणार आहे.

या धोरणांतर्गत भारताने दक्षिण प्रशांत महासागरातील लहान द्वीप-राष्ट्रांशी, जसे की फिजी, मायक्रोनेशिया, पॉलिनेशिया आणि सोलोमन बेटे, यांच्याशी थेट संपर्क साधून त्यांना 'पॅसिफिक आयलंड कंट्रीज' असा सन्मान दिला आहे. भूभागाने जरी हे देश लहान असले, तरी त्यांचे विशेष आर्थिक सागरी क्षेत्र (Exclusive Economic Zone) खूप मोठे आहे, आणि तिथेही भारत आपली स्वतंत्र भागीदारी मजबूत करत आहे, जेणेकरून चीन तिथे आपले लष्करी तळ उभारू शकणार नाही.

या सर्व घडामोडींचा जागतिक राजकारणावर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर खूप मोठा परिणाम होत आहे. आत्तापर्यंत अमेरिका आणि युरोपियन देश स्वतःला जगाचे पोलिस समजायचे. परंतु आता हिंद महासागराची सुरक्षा केवळ भारताच्या बळावरच शक्य आहे, हे या जागतिक महासत्तांनी मान्य केले आहे. अमेरिकेने भारताला 'नेट सिक्युरिटी प्रव्हायडर' (Net Security Provider) म्हणजेच या संपूर्ण क्षेत्राचा मुख्य सुरक्षा रक्षक म्हणून घोषित केले आहे. यामुळे जागतिक स्तरावर भारताचे वजन प्रचंड वाढले आहे आणि कोणत्याही आंतरराष्ट्रीय करारांमध्ये आता भारताच्या संमतीशिवाय निर्णय घेणे अशक्य झाले आहे.

या संपूर्ण महाखेळात जपान आपला तंत्रज्ञानाचा आणि पायाभूत सुविधांचा महत्त्वाचा भागीदार आहे, तर ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दक्षिण प्रशांत महासागरात सहकार्य मजबूत करत आहेत. भारत कोणत्याही महासत्तेच्या दबावाखाली न येता, स्वतःच्या राष्ट्रीय हितावर आधारित ही स्वतंत्र सामरिक भूमिका तयार करत आहे.

आपल्या भारतीय शास्त्रज्ञांनी तयार केलेली ब्रह्मोस आणि अस्त्र क्षेपणास्त्रे आज जगात भारताचे नाव उंच करत आहेत आणि आपली ही नवी सागरी चाणक्य नीती भारताला जागतिक स्तरावर एक मजबूत महाशक्ती बनवण्याच्या दिशेने घेऊन जात आहे. एक भारतीय म्हणून ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

सागरमाला प्रकल्प, चाबहार ते सबांग बंदरांचा विकास आणि चिनी पाणबुड्यांची समुद्राखाली कोंडी करणारा हा नवा चक्रव्यूह पाहता, भारत येत्या काळात या सागरी क्षेत्राचा खरा रक्षक बनेल असे वाटते का?

**- संतोष कारखानीस**

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- **'Digital wellness' कार्यशाळा**

'ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय' यांच्यावतीने दि. १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी 'Digital wellness' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. या प्रसंगी उपस्थित सर्वांना आजच्या डिजिटल युगाचे संभाव्य धोके काय आहेत आणि त्यापासून बचाव कसा करता येईल याबाबत जागरूक करण्यात आले.

- **एस. एस. सी. रिझल्ट**
  **शालांत परीक्षा मार्च २०२५–२६**
  **विषयातील सर्वप्रथम**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| मराठी | अथर्व गणेश कदम | ९५ |
| | दिशा ज्ञानेश्वर मोरे | ९५ |
| हिंदी | दिशा ज्ञानेश्वर मोरे | ९० |
| संस्कृत | अथर्व दिपक चौधरी | ९८ |
| | अदिती शिवाजी फडतरे | ९८ |
| | प्राची दिलीप चव्हाण | ९८ |
| इंग्रजी | वेदांगी निलेश माने | ९४ |
| | अवनी अमोल वारगांवकर | ९४ |
| गणित | प्रद्युम्न सदानंद भोईर | ९५ |
| | खुशी ललित पाटील | ९५ |
| विज्ञान | खुशी ललित पाटील | ९१ |
| | किमया सुनील दवंडे | ९१ |
| समाजशास्त्र | अदिती शिवाजी फडतरे | ९५ |

| | मागासवर्गीय प्रथम | टक्के |
|---|---|---|
| SC | श्रावणी सुनिल पालवे | ६६ |

शालांत परीक्षेतील गुणानुक्रमे प्रथम दहा विद्यार्थी

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | खुशी ललित पाटील | ४५४+५ | ९१.८० |
| २ | अदिती शिवाजी फडतरे | ४५६ | ९१.२० |
| ३ | अथर्व दीपक चौधरी | ४५५ | ९१.०० |
| ३ | जान्हवी विलास पवार | ४५२+३ | ९१.०० |
| ४ | किमया सुनील दवंडे | ४५४ | ९०.८० |
| ५ | अथर्व गणेश कदम | ४४८+५ | ९०.६० |
| ५ | श्रावणी सुभाष गाडगे | ४५०+३ | ९०.६० |
| ६ | दिशा ज्ञानेश्वर मोरे | ४४७+५ | ९०.४० |
| ७ | प्रद्युम्न सदानंद भोईर | ४४८+३ | ९०.२० |
| ७ | प्राची दिलीप चव्हाण | ४५१ | ९०.२० |
| ८ | आर्या अभिजीत बाबर | ४४४ | ८८.८० |
| ९ | मनस्वी सचिन विचारे | ४४२ | ८८.४० |
| १० | चैतन्य महेंद्र रोडे | ४३५ | ८७.०० |

- **प्रवेशोत्सव–२०२६**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभागातील सर्व विद्यार्थ्यांचा 'प्रवेशोत्सव' दि. १५ जून रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात व्हावे यासाठी सर्व शाळा फुलांच्या माळा, तोरणे, पताका लावून

सजवली होती. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ सुबक रांगोळी काढण्यात आली. तसेच एक सेल्फी पॉईंट देखील तयार करण्यात आला होता.



नवीन शैक्षणिक वर्षातील पहिला दिवस म्हणून इ. ५वी, ६वी, ७वीच्या विद्यार्थ्यांचा एकत्रितपणे परिपाठ घेण्यात आला. परिपाठाच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या स्थानिक नगरसेविका मृणाल ताई पेंडसे यांनी देखील मुलांचे स्वागत केले. आणि शैक्षणिक वाटचालीत यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या प्राथमिक विभागातून नव्यानेच माध्यमिक विभागात प्रवेश केलेल्या इ. ५ वीच्या प्रत्येक विद्यार्थ्याचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. सौ. सायली माने बाईंनी सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या इमारतीची ओळख करून दिली. तसेच कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना वाघुले, उपमुख्याध्यापिका सौ. सुषमा बोराडे आणि ५वी च्या सर्व शिक्षकांची देखील थोडक्यात ओळख करून दिली. सौ ज्योती केदारे बाईंनी शाळेच्या सर्व नियमांची उजळणी विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी इ. ५ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप केले.



अशाप्रकारे शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने इ.५ वी ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा मोठ्या आनंदाने पार पडला.

- **पर्यावरण दक्षता मंडळ**

पर्यावरण दक्षता मंडळातर्फे, बुधवार दि.१७ जून रोजी इ.७ वी 'अ' आणि 'ब' या वर्गांसाठी पर्यावरण कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये 'समुद्र कासव' समुद्री जीव संदर्भात चित्ररूप माहिती देण्यात आली. माहिती अतिशय नावीन्यपूर्ण होती. विद्यार्थी यामध्ये आनंदाने सहभागी झाले. कार्यक्रमाची व मान्यवरांची ओळख सौ. धोत्रे यांनी करून दिली, तर उपस्थित सर्वांचे आभार श्री. देसले सर यांनी मानले.

- **२१ जून – आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारा आंतरराष्ट्रीय योग दिन दि. २१ जून रोजी शाळेच्या दोन्ही विभागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी घंटाळी मित्र मंडळाच्या मुख्य योग शिक्षिका सुरेख चिकटे, प्रदर्शक अंकित म्हस्के, रेश्मा धारगाडे, रूपाली काथार यांच्या मार्गदर्शनाखाली इ .६ वी, ७ वी ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यानी, तसेच एन.सी.सी च्या विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचा सराव करून योगाचे महत्त्व जाणून घेतले. योगामुळे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.



काही लोक आनंद मिळेल ते काम करतात, तर काही लोकं मिळेल त्या कामात आनंद शोधतात!..

## 'व्हिजनरी स्टुडन्ट अवॉर्ड्स'



शालांत परीक्षेत उत्कृष्ट गुण संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी 'वावीकर इन्स्टिट्यूट' आणि 'ठाणे वैभव' यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हिजनरी स्टुडन्ट अवॉर्ड्स' पुरस्कार सोहळा दि. १३ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी 'ठाणे वैभव' चे व्यवस्थापकीय संपादक निखिल बल्लाळ, 'वावीकर इन्स्टिट्यूट' चे डॉ. चंद्रशेखर वावीकर, डॉ. वैशाली वावीकर, डॉ. गार्गी वावीकर, तसेच 'होम रिवाईस' च्या सह-संस्थापिका लीना कोरे, तसेच 'सिंघानिया स्कूल' च्या मुख्याध्यापिका लक्ष्मी मधुसूदन मान्यवर म्हणून उपस्थित होते

आपल्या शाळेतून यंदाच्या शालांत परीक्षेत अव्वल गुण संपादन केलेल्या खुशी पाटील या विद्यार्थिनीला पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच या संपूर्ण पुरस्कार सोहळ्याचे निवेदन आपल्याच शाळेतील शिक्षिका सौ. साधना जोशी यांनी केले.

- **छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त निबंध स्पर्धा**

दि. २६ जून रोजीच्या 'छत्रपती शाहू महाराज जयंती' निमित्त इयत्ता ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'छत्रपती शाहू महाराजांचे जीवन कार्य' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतून स्वरा चव्हाण (७वी -अ), नेहा साटम (७वी-अ), विनया खामकर (७वी -अ) हे विद्यार्थी विजेते ठरले.

प्रथम क्रमांक - सोनाली जड्यार (इ. ९वी-अ )
द्वितीय क्रमांक - श्रेया मोरे (इ. ८वी-अ )
तृतीय क्रमांक - श्रावणी शेलार (इ. ९वी-अ )

- **शिक्षक गौरव**

पोलिस व शिक्षण विभागाच्या अधिकारांतर्गत, पोलिस आयुक्तालय ठाणे व पोलिस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटन, नागपूर यांच्या वतीने दि. ३ जून ते १० जून २०२६ या कालावधीत 'आर.एस.पी. अधिकारी शिक्षक प्रशिक्षण' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या शाळेच्या सौ. संगिता तुकाराम तातळे यांनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना आर.एस.पी. (Road Safety Patrol) अधिकारी म्हणून प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'सडक सुरक्षा, जीवन रक्षा' पोस्टर मेकिंग स्पर्धा सोलारिस हॉस्पिटल, 'ठाणेवैभव', रोटरी क्लब ऑफ ठाणे, अर्बानिया, ठाणे ट्रॅफिक पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. रविवार दि.२८ जून रोजी सोलारिस हॉस्पिटल, ए. पी. शाह इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट, 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ,



सोलारिस हॉस्पिटलचे डॉ. दीपक ऐवले, डॉ. अमित ऐवले, 'ठाणेवैभव'चे व्यवस्थापकीय संपादक निखिल बल्लाळ आणि सचिन माळवे, वाहतूक सुरक्षेसाठी काम करणाऱ्या डॉ. शोभा डॅनिअल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते खालील विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

- प्रथम क्रमांक - सोनाली जड्यार (इयत्ता ९वी अ)
- द्वितीय क्रमांक - श्रेया मोरे (इयत्ता ८वी अ)
- तृतीय क्रमांक - श्रावणी शेलार (इयत्ता ९वी अ)

मनस्वी जाधव, जुईली ठाणेकर, मिंजल रेणुसे, भूमी ऐत, स्वरा विशे, खुशी हनवते, ओमश्री गडकर, राधिका पाडळे , परी तुरे, आर्या पवार, सिया पवार, दिया पाटील, समृद्धी जाधव, श्रीया कापडी या सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र प्राप्त झाले. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केल्याबद्दल सौ. संगिता तातळे यांना सन्मानचिन्ह, तसेच शाळेला ही सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

- **जी पी एल स्पर्धा**



दि. २७ व २८ जून रोजी कोपरी येथे झालेल्या जी पी एल म्हणजेच जिम्नॅस्टिक प्रीमियम लीग या स्पर्धेत इ. ६वी-ब मधील मृण्मयी प्रशांत लंके हिला पाचव्या लेवल मध्ये वॉल्ट या प्रकारात द्वितीय व बार या प्रकारात तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

- ठाणे महानगरपालिका आणि 'राज्याभिषेक समारोह संस्था', ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'श्री छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन सोहळा' दि. ५ जुलै २०२६ रोजी गडकरी रंगायतन येथे साजरा झाला. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्या शाळेतील मुद्रा मंगेश दामले (इ. ५वी-अ) या विद्यार्थिनीने 'शिवपूर्व ते राज्याभिषेक' या विषयावर वक्तृत्व सादर केले. सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते तिला पुरस्कार म्हणून रोख रुपये २००/- , पुष्पगुच्छ तसेच शिवाजी महाराजांचे पुस्तक प्राप्त झाले.



## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

१९७६-१९२६ विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. ए. के. जोशी या शाळेचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष. वर्षभर विविध उपक्रमांनी भरगच्च असलेल्या या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात झाली.

### १२ जून - परिचयात्मक सभा

पूर्व प्राथमिक विभागत म्हणजेच नर्सरी, ज्युनियर व सिनीयर के.जी. मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या पालकांकरता परिचयात्मक सभेचे आयोजन शाळेच्या गार्गी सभागृहात करण्यात आले होते. सभेची सुरुवात शिक्षिका सौ. प्रीती कुळकणी यांच्या स्वागत गीताने झाली. पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. अपर्णा वरुडकर यांची ओळख शिक्षिका वंदना मल्होत्रा यांनी करून दिली व शाळेच्या ५० वर्षांतील यशाचा आढावा अर्पणा वरुडकर यांनी पालकांना सचित्र माहितीतून दिला.

पूर्व प्राथमिक विभागात वर्षभर घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती सुद्धा पालकांना देण्यात आली.




माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका डॉ. सौ. अस्मिता मोहिले, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अंजना कपूर या सभेसाठी उपस्थित होत्या.

या प्रसंगी उपस्थितांना शीतपेय देण्यात आलं. यानंतर पालकांनी शिक्षक पूर्व प्राथमिक विभागाच्या वर्गांना भेट देऊन शिक्षकांशी संवाद साधला.

**१५ जून – शाळेचा पहिला दिवस –**



सोमवार १५ जून हा शाळेचा पहिला दिवस. नर्सरीच्या मुलांचा थोडासा रडण्यात, खेळण्यात हा दिवस पार पडला. सर्व नवीन वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी थोडासा कालावधी मुलांना लागतो. ज्युनियर आणि सिनियरची मुलं मात्र खूप दिवसांनी शाळेतल्या मित्र-मैत्रिणींबरोबर खेळ खेळ्यात पहिल्याच दिवशी रमली.



**२१ जून – जागतिक योग दिवस**

२१ जून हा जागतिक योग दिवस म्हणून साजरा केला जातो. गुरुवार १८ जून रोजी हा दिवस आमच्या विभागात आम्ही साजरा केला. यावर्षीपासून पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणासाठीचा गणवेश देण्यात आला आहे. हा गणवेश घालून मुलांनी योगा दिवस साजरा केला.





विविध योग प्रकार शिकवण्यासाठी आमच्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका इ. पयवेक्षिका, तसेच शारीरिक शिक्षण शिक्षिका म्हणून प्रदीर्घ अनुभव असलेल्या प्रियांका भांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**शाळा प्रवेशोत्सव – १५ जून २०२६**

**शाळेत नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७**

सोमवार दिनांक १५ जून पासून शाळा सुरू झाली. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा सज्ज होती. शाळेत वर्ग सजावट करून स्वागताचे फलक लेखन करण्यात आले होते. चिमुकल्यांच्या शाळेमध्ये येण्याने शाळेला जणू नवचैतन्य आले. विद्यार्थ्यांचे औक्षण करून व कुंकुम लावून मुलांचे स्वागत करण्यात आले. परिपाठाचे आयोजन केले गेले. शाळेच्या माजी डीन



सौ. कालिंदी कोल्हटकर, मुख्याध्यापिका सौ. अंजना कपूर व शिक्षक वृंद यांनी सर्व मुलांचे स्वागत व कौतुक केले. शाळेमध्ये मुलांना नवीन वर्ग, नवीन मित्रमैत्रिणी, नवीन शिक्षक यांची ओळख करून देण्यात आली. तसेच शिस्तीचे धडे देण्यात आले. शाळा सुटताना




मुलांना पेन्सिल व त्यासोबत एक संदेश दिला गेला. पेन्सिल हे माता सरस्वतीचे प्रतीक आहे, असे छोट्याशा भेटवस्तूद्वारे आम्ही आमच्या चिमुकल्या तारकांच्या मनामध्ये बिंबवण्याचा प्रयत्न केला व माता सरस्वतीने त्यांच्यावर ज्ञान, बुद्धिमत्ता व यशाचा अखंड आशीर्वाद व वर्षाव करण्याची प्रार्थना केली. अशाप्रकारे शाळेत उत्साहाने प्रवेशोत्सव साजरा झाला.

**आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा**

शाळेत (प्राथमिक विभाग) आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व प्रभावीपणे मांडत नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, हा संदेश दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी योगाची प्राचीन परंपरा, त्याचा इतिहास आणि जगभर झालेला प्रसार याविषयी माहिती दिली. तसेच दरवर्षी २१ जून रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय योग दिन हा योगशास्त्राच्या गौरवासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी जगभर साजरा केला जातो, याचे महत्त्वही त्यांनी विशद केले.

इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांनी ताडासन, शवासन, भुजंगासन, पवनमुक्तासन आणि वृक्षासन यांसारख्या विविध योगासनांचे सुंदर सादरीकरण केले. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण प्रात्यक्षिकांमुळे योगाचे आरोग्यदायी फायदे सर्वांसमोर प्रभावीपणे उलगडले.



इयत्ता ३ व ४ च्या विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व आणि त्याचे विविध लाभ याविषयी माहिती देत योग करू या, योग करू या, रोज सकाळी योग करू या हे प्रेरणादायी गीत सादर केले. गीताच्या माध्यमातून निरोगी जीवनासाठी योग हा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर करून योगाचा जीवनाशी असलेला जवळचा संबंध अधोरेखित केला.





शारीरिक शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली काही योगासने प्रात्यक्षिक स्वरूपात सादर करण्यात आली. त्यानंतर शिक्षक व कर्मचारी वर्गानेही उत्स्फूर्तपणे योगासनांचा सराव करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला.





हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारा, योगाबद्दलची आवड वाढविणारा आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारा ठरला.

**चित्रकला स्पर्धा – २५ जून २०२६**

**रोशन जाल पटेल मॅडम यांच्या स्मृती प्रीत्यर्थ आयोजित चित्रकला स्पर्धेचा अहवाल**

शाळेत इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी रोशन जाल पटेल यांच्या स्मृती प्रीत्यर्थ चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा २५ जून २०२६ रोजी शाळेत मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि कलात्मकता वाढवण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील एकूण सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला.



एक तासाच्या उत्साही चित्रकलेनंतर परीक्षकांनी चित्रांचे परीक्षण केले. चित्रांमध्ये मुलांनी सुंदर रंगसंगती व कल्पकता दाखवली गेली . त्यानंतर निकाल जाहीर करण्यात आले व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.





''अशा स्पर्धांमुळे मुलांच्या सुप्तगुणांना वाव मिळाला.'' सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्पर्धेचा आनंद घेतला.

**भ्रमणशील संग्रहालयातून इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना इतिहासाची अनोखी सफर**

दि. ११ जुलै २०२६ : व्ही.पी.एम.च्या के. जी. जोशी कला महाविद्यालय व एन. जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या सहकार्याने, तसेच प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे यांच्या आयोजनाखाली

भरविण्यात आलेल्या भ्रमणशील संग्रहालयाला (Museum on Wheels) शाळेच्या प्राथमिक विभागाच्या इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांसोबत शैक्षणिक भेट दिली.








या संग्रहालयात सिंधू संस्कृती, मेसोपोटेमिया व प्राचीन भारताशी संबंधित प्रतिकृती, पुरातत्त्वीय अवशेष आणि माहितीपूर्ण प्रदर्शन विद्यार्थ्यांनी पाहिले. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना इतिहासाचा रंजक परिचय झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी कुतूहल निर्माण होऊन अनुभवाधारित शिक्षणाची प्रभावी संधी मिळाली.









हा शैक्षणिक उपक्रम यशस्वी व संस्मरणीय करण्यासाठी अंकुर काणे सर व त्यांच्या संपूर्ण टीमचे विद्यालयातर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

### रविवार, २१ जून २०२६ – शाळेत योग दिनाचा उत्साह; दीप योगाचे प्रात्यक्षिक ठरले मुख्य आकर्षण!

शाळेत २१ जून २०२६, रविवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी योग तज्ज्ञ श्री. आनंद भिडे, श्री. प्रथमेश गांगुर्डे आणि सौ. शीतल वाघचौरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थी व शिक्षकवर्गाला सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान, संगीताच्या तालावर, लयबद्ध पद्धतीने केली जाणारी योगासने, ताल योगा, दीप योग व मंडला योगा यांचे प्रशिक्षण दिले. दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले.



जे कारणे देण्यात तरबेज असतात ते क्वचितच जीवनात यशस्वी होतात.



मंडला योगामध्ये सर्वांनी एकतालात योगासने केली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले दीप योगाचे प्रात्यक्षिक. मस्तकावर पेटता दिवा ठेवून तोल सांभाळण्याचा हा योग प्रकार आहे 'हा आगळावेगळा योग्य प्रकार करण्यासाठी विद्यार्थ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती या कलाप्रकाराने उपस्थितांची दाद मिळवली.'





''या योग प्रकाराने  शरीर सुदृढ राहते, मन शांत होते आणि एकाग्रता वाढते, असे श्री. भिडे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रमांमध्ये हिरिरीने भाग घेतला. मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर घवघवीत कामगिरी!**

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, कला, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे सुवर्ण वर्ष झळाळून टाकण्यात मोलाची भर घातली आहे.

इस्कॉनद्वारे आयोजित मूल्यशिक्षण स्पर्धेत इयत्ता आठवीची कु. रिधिमा पाटसकर व इयत्ता सहावीची कु. काव्या मिस्त्री या राष्ट्रीय विजेत्या ठरल्या. देशभरातून सुमारे १,४५,००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी केवळ १२० विद्यार्थ्यांची राष्ट्रीय विजेते म्हणून निवड करण्यात आली. या १२० विद्यार्थ्यांपैकी शाळेतील या दोन गुणवंत विद्यार्थिनींनी बाजी मारली.







हेरिटेज फाउंडेशन ऑफ आर्ट अँड कल्चर स्पर्धेत इयत्ता पाचवीची कु. तनया करेकर, इयत्ता सहावीची, कु. वनजा राव,  इयत्ता नववीचा कु. राजस जोशी व कु. कृष्णाई खेडेकर आणि  यांनी अनुक्रमे कथक, हिंदुस्थानी शास्त्रीय गायन व भरतनाट्यम् या कलाप्रकारांत उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'कलाकृती मेडल ऑफ प्रिसिएशन' पटकावले.

दादोजी कोंडदेव स्टेडियमवर झालेल्या टीडीटीटीए

टेबल टेनिस स्पर्धेत इयत्ता पाचवीची कु. कियारा लेले ११ वर्षांखालील गटात विजेती ठरली, तर इयत्ता सहावीचा कु. सव्या कोठावडे १३ वर्षांखालील गटात उपविजेत्या संघाचा सदस्य होता.




अखिल भारतीय संस्कृती संघ, पुणे यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत कु. कृष्णाई खेडेकर (इ. ६ वी) हिने सोलो सेमी-क्लासिकल नृत्य प्रकारात राष्ट्रीय विजेतेपद मिळवले.




शाळेने 'सकाळ' वृत्तपत्राच्या पर्यावरण उपक्रमातही सहभाग घेतला. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना वृक्षारोपण व पर्यावरण जागृतीसाठी सीड बॉल्सचे वाटप करण्यात आले. संस्थेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### कै. मॅडम रोशन जाल पटेल स्मृती चित्रकला स्पर्धा

शाळेच्या माजी अधीक्षक व पहिल्या मुख्याध्यापिका कै. मॅडम रोशन जाल पटेल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वार्षिक चित्रकला स्पर्धेचे आयोजन २५ जून रोजी करण्यात आले.

स्पर्धेपूर्वी कला शिक्षिका मनीषा साळी यांनी मॅडम यांच्या शिस्त, समर्पण आणि शिक्षणनिष्ठेचा प्रेरणादायी वारसा विद्यार्थ्यांना सांगितला व ही मूल्ये जपून त्यांचा वारसा जिवंत ठेवण्याचे आवाहन केले.







या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना कलेच्या माध्यमातून आपली सर्जनशीलता व कल्पकता व्यक्त करण्याची संधी मिळाली आणि एका दूरदर्शी शिक्षिकेला मनापासून आदरांजली वाहण्यात आली.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात १३ जून २०२६ पासून झाली. दि. १३ जून २०२६ रोजी द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी उद्घाटनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील २५० विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १५ जून २०२६ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी उद्घाटनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात

आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

नव्या शैक्षणिक वर्षाची सकारात्मक सुरुवात करण्याच्या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विंदा मांजरमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि शिस्तीचे महत्त्व समजावून सांगितले. स्वायत्त शिक्षण पद्धतीतील संधींचा योग्य उपयोग करून शैक्षणिक प्रगती साधण्याचे आवाहन त्यांनी केले.यासोबतच अभ्यासाबरोबरच संशोधन, कौशल्यविकास आणि व्यक्तिमत्त्व विकास यांनाही तितकेच महत्त्व असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. महाविद्यालयातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.







**फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम २०२६–२७**

इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेल (IQAC) तर्फे १८ जून ते २३ जून २०२६ दरम्यान २०२० नंतर रुजू झालेल्या प्राध्यापकांसाठी संस्थेची शैक्षणिक रचना, गुणवत्ता हमी प्रक्रिया, प्रशासकीय कार्यपद्धती, संशोधन संधी, अध्यापन पद्धती, व्यावसायिक नीतिमत्ता आणि संवाद कौशल्य यांची माहिती देण्याकरिता पाच दिवसीय फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विंदा मांजरमकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी महाविद्यालयाची उद्दिष्टे, शैक्षणिक रचना आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) च्या अंमलबजावणीविषयी मार्गदर्शन केले.

इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेल समन्वयक डॉ. कल्पिता मुळे यांनी NAAC मानांकन प्रक्रिया, गुणवत्ता निकष आणि Maturity-Based Grading System याबाबत माहिती दिली. प्रा. सायली दप्तर्दार आणि प्रा. पूर्वी शाह यांनी दस्तऐवजीकरण, नोंदी व्यवस्थापन, उपस्थिती, परीक्षा कागदपत्रे व आर्थिक नोंदी यांचे महत्त्व स्पष्ट केले. दुसऱ्या दिवशी डॉ. उर्मिला कुमावत यांनी वैयक्तिक फाईल व्यवस्थापन, अभिलेख जतन, CAS आवश्यकता आणि शैक्षणिक नोंदींच्या व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. डॉ. संदीप कहांडळ यांनी संशोधन निधी, फेलोशिप, सल्लागार सेवा आणि संशोधन अनुदानाच्या संधींबाबत माहिती दिली. डॉ. तुकाराम नवघरे आणि डॉ. हृषिकेश लाभाडे यांनी नावीन्यपूर्ण अध्यापन साधने व डिजिटल अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण दिले.

या कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, मुंबई येथील डॉ. लॉली जैन आणि डॉ. तृप्ती तावडे–राणे यांनी विद्यार्थी–केंद्रित अध्यापन, ICT आधारित अध्यापन व मूल्यमापन पद्धतींवर मार्गदर्शन केले. प्राध्यापकांना Book Widgets, Quizlet, Testmoz, Crossword Labs, Storyboard That आणि Edraw Mind यांसारख्या डिजिटल साधनांची माहिती देण्यात आली.

चौथ्या दिवशी व्यावसायिक नीतिमत्ता, परीक्षा प्रक्रिया आणि संवाद कौशल्य या विषयांवर सत्रे घेण्यात आली. उपप्राचार्या सौ. मीनल वानखेडे यांनी नीती, संस्कार आणि मानवी मूल्ये या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. जयश्री पवार यांनी परीक्षा संहिता, गोपनीयता, निष्पक्ष मूल्यमापन आणि शैक्षणिक प्रामाणिकतेचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. अश्विनी टिळक आणि डॉ. कल्पिता मुळे यांनी प्रभावी संवाद, देहबोली आणि आंतरवैयक्तिक संवाद कौशल्यांवर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अंतिम दिवशी मायक्रो टीचिंग आणि केस स्टडी यावर आधारित उपक्रम आयोजित करण्यात आले. डॉ. उर्मिला कुमावत यांनी मूल्यमापनाच्या मार्गदर्शक तत्त्वांची माहिती दिली. प्राध्यापकांचे दहा गट तयार करून विविध विषयांवर सादरीकरणे व केस स्टडी सादर करण्यात आल्या. प्राध्यापकांनी केलेल्या सादरीकरणांचे मूल्यमापन डॉ. पारिया आणि डॉ. गोखे यांनी केले, तर केस स्टडीचे परीक्षण सौ. मीनल वानखेडे आणि डॉ. गोखे यांनी केले.

सर्व सहभागी प्राध्यापकांनी उत्साहाने सहभाग घेत सर्जनशीलता, संघभावना आणि प्रभावी संवाद कौशल्यांचे प्रदर्शन केले. डॉ. स्वरूपा अग्निहोत्री, प्रा. इशिका पारुई आणि डॉ. हृषिकेश लाभाडे यांना उत्कृष्ट सादरीकरणासाठी Best Presentation Award प्रदान करण्यात आला. हा पाच दिवसीय कार्यक्रम प्राध्यापकांच्या व्यावसायिक विकासासाठी उपयुक्त ठरला आणि प्राध्यापकांमध्ये सहकार्याची भावना, आत्मविश्वास आणि शैक्षणिक उत्कृष्टतेसाठीची बांधिलकी वाढली.







**राष्ट्रीय सांख्यिकी दिन उत्सव व सांख्य क्लबचे उद्घाटन**

संख्याशास्त्र विभागाने दिनांक २९ जून २०२६ रोजी राष्ट्रीय सांख्यिकी दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. भारतीय संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महानोलोबिस यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस संपूर्ण भारतात साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्त पतंजली सभागृहामध्ये प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी विविध भारतीय संख्याशास्त्रज्ञ आणि त्यांनी दिलेल्या योगदानाचा थोडक्यात परिचय करून दिला.

यावेळी श्री. हिरापुण्यतीर्थ स्वैन, सहाय्यक महाव्यवस्थापक (असिस्टंट जनरल मॅनेजर) स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे बँकिंग क्षेत्रामधील व्यवसायाच्या संधी, तसेच बँकिंग क्षेत्रामध्ये संख्याशास्त्र ह्या विषयाचा होणारा वापर यासंदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात व्याख्यान पार पडले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनात असलेले प्रश्न विचारून त्याचे योग्य ते निरसन करून घेतले. तसेच या दिनाचे औचित्य साधून संख्याशास्त्र विभागाच्या 'संख्या क्लब' २०२६ याचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्या मीनल वानखेडे, संख्याशास्त्र विभागप्रमुख सौ. मोहिनी कुलकर्णी आणि सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन सहाय्यक प्राध्यापक श्री. अभिषेक बांदिवडेकर यांनी केले. अशाप्रकारे राष्ट्रीय सांख्यिकी दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.



### जागतिक पर्यावरण दिन

दिनांक ०५.०६.२०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा होता. विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी पर्यावरण विषयावरील माहितीचे प्रदर्शन, तसेच पर्यावरणाशी संबंधित विविध पुस्तकांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले. या प्रदर्शनामध्ये पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि निसर्ग संरक्षण याबाबतची पुस्तके ठेवण्यात आली होती.




### योग दिवस

दिनांक २०.०६.२०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात योग दिवस साजरा करण्यात आला. योग विषयावरील माहितीचे विशेष प्रदर्शन आणि संबंधित विविध पुस्तकांचे आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये योगासन, प्राणायाम आणि ध्यानधारणेवरील पुस्तके ठेवण्यात आली होती.




### राजर्षी शाहू महाराज जयंती

दिनांक २५.०६.२०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचा उद्देश राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची आणि विचारांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी त्यांना अभिवादन केले. ग्रंथालय विभागामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावरील माहितीचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. तसेच त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विविध पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण, समाजसुधारणा आणि समानतेसाठी केलेल्या कार्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रेरणादायी विचारांची ओळख झाली. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात राजर्षी शाहू महाराज जयंतीचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.




### राष्ट्रीय सांख्यिकी दिवस

दिनांक २९.०६.२०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात राष्ट्रीय सांख्यिकी दिवस साजरा करण्यात आला. हा दिवस भारतीय संख्याशास्त्राचे

जनक प्राध्यापक प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या जन्मदिवसानिमित्त साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. अभिषेक सरांनी प्राध्यापक प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांना अभिवादन केले. ग्रंथालय विभागामध्ये संख्याशास्त्र विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये सांख्यिकी विषयाशी संबंधित विविध पुस्तके व माहिती उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्राध्यापक महालनोबिस यांच्या कार्याची आणि संख्याशास्त्रातील योगदानाची माहिती मिळाली. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात राष्ट्रीय सांख्यिकी दिवसाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.




## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

महाविद्यालयाचा विधी द्वितीय वर्ष सत्र - ४ निकाल ६ जून रोजी जाहीर झाला. तसेच विधी प्रथम वर्ष सत्र - १ चा पुनर्मूल्यांकन निकाल जाहीर झाला.

७ जून रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि ५ विद्यार्थ्यांनी माननीय न्यायमूर्ती अभय ओका यांच्या पर्यावरण विषयावरील व्याख्यानाला हजेरी लावली.

विधी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक विनोद हरिभाऊ वाघ यांची सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नती झाली. त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.



डॉ. विनोद हरिभाऊ वाघ

सहाय्यक प्राध्यापक डॉ. चंदणी वि. घोगरे यांनी मुंबई विद्यापीठाच्या मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्रामार्फत आयोजित फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम (Faculty Induction Programme) दिनांक १८ मे २०२६ ते १३ जून २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या पूर्ण केला. त्यांनी प्रशिक्षण कार्यक्रमातील सर्व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून 'A' श्रेणी प्राप्त केली. तसेच, डॉ. चंदणी वि. घोगरे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचा संशोधन विषय Regulation of Noise Pollution in India: A Critical Analysis with Reference to Judicial Decisions हा असून, या संशोधनामध्ये भारतातील ध्वनी प्रदूषणासंदर्भातील कायदेशीर तरतुदी, न्यायालयीन निर्णय आणि नियामक व्यवस्थेचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे.



डॉ. चंदणी घोगरे

१४ जून २०२६ रोजी मुंबई विद्यापीठाने विधी तृतीय वर्ष सत्र - ६ चा निकाल जाहीर केला. विधी तृतीय वर्ष प्रवेश १६ जून २०२६ ते ३० जून २०२६ दरम्यान करण्यात आले.



महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. गजानन चव्हाण यांची महाराष्ट्र

आणि गोवा बार कौन्सिलवर दुसऱ्यांदा निवड झाली आहे.

मुंबई विद्यापीठाने विधी द्वितीय वर्ष सत्र - २ परीक्षा - जून १८, २०, २३, २५ या कालावधीत घेण्यात आल्या.

१८ जून २०२६ विद्या प्रसारक मंडळ ठाणे, विधी महाविद्यालय ठाणे, ACADMiN ERP नवीन सेवा प्रदाता.

एल.एल.एम. प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया व्यवसाय कायदा, घटनात्मक आणि प्रशासकीय कायदा, फौजदारी कायदा आणि फौजदारी प्रशासन या विषयांसाठी २४ जून २०२६ रोजी पासून सुरू झाली.

एल.एल.एम. द्वितीय सत्र ऑनलाइन पूर्वतयारी परीक्षा व उजळणी परीक्षा दि. २६, २७, २८ व ३० जून रोजी घेण्यात आल्या.

**महाविद्यालयाचे नवोन्मेष आणि उत्कृष्टता सल्लागार मंडळ**

महाविद्यालयाला मा. न्यायमूर्ती अभय ओका यांच्या मार्गदर्शन व पाठिंब्याचा अत्यंत सन्मान वाटतो, ज्यांच्या शिफारसीवरून हे विद्या प्रसारक मंडळ विधी महाविद्यालयाचे नवोन्मेष आणि उत्कृष्टता सल्लागार मंडळ लवकरच स्थापन करण्यात येत आहे. मंडळाचे अध्यक्ष मा. न्यायमूर्ती श्री अभय ओका असतील. हे मंडळ विद्या प्रसारक मंडळ संस्थेला उत्कृष्टतेने वैशिष्ट्यपूर्ण दर्जेदार विधी शिक्षणाचे केंद्र बनविण्याच्या दृष्टिकोनातून स्थापन करण्यात येत आहे. या विधी महाविद्यालयाची ध्येये व उद्दिष्टे अधिक परिणामकारकपणे पूर्ण करण्यास यामुळे बळकटी मिळेल अशी आम्हाला आशा आहे. या मंडळामध्ये सदस्य म्हणून प्रख्यात विधिज्ञांचे स्वागत करण्याचा आम्हाला विशेष सन्मान वाटतो : ॲड. श्री. गजानन चव्हाण, मा. न्यायाधीश श्री सदाशिव देशमुख, ॲड. श्री. विजय आगाशे आणि ॲड. श्री. पासबोला.

वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयाची महाविद्यालय विकास समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची बैठक २७ जून २०२६ रोजी पडली.

विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते २७ जून २०२६ रोजी कर्मचारी कक्षातील नवीन आसन व संग्रहण साहित्य आणि पायाभूत सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. तसेच या उद्घाटन वेळेस श्री. रवींद्र आर रसाळ, श्री. जयंत एन. कायाळ, ॲड. रामचंद्र एस. आपटे, श्री भोळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



**विद्या प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या तृतीय वर्षाचा निकाल जून २०२६ मध्ये लागला. २०२५-२०२६ शैक्षणिक वर्ष हे तंत्रनिकेतनाचे शेवटचे वर्ष होते. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ चा निकाल हा तंत्रनिकेतनाच्या कारकिर्दीतला अंतिम निकाल आहे.

प्रत्येक विभागाचे गुणानुक्रमाने प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभाग (२०२५-२६)

| क्रमांक (श्रेणी) | विभाग | विद्यार्थ्याचे नांव | गुण | पैकी | % |
|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिरिंग | मुकादम मोझाम मुबिन | १६१६ | १७०० | ९५.०६% |
| २. | | शेख झिनत बानो शाहजाद | १६१४ | १७०० | ९४.९४% |
| **इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम (२०२५-२६)** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | पाटकर सुयश दिपक | १६३७ | १८०० | ९०.९४% |
| २. | | देशमुख प्रशांत खांडु | १६०४ | १८०० | ८९.११% |
| **इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग (२०२५-२६)** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | पवार ओम राजेंद्र | १५५९ | १७५० | ८९.०९% |
| २. | | राना कैलाश सिंग किशन सिंग | १५१९ | १७५० | ८६.८०% |
| **इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग (२०२५-२६)** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | पंडजी आदित्य उदयकुमार | १६५३ | १७०० | ९७.२४% |
| २. | | लावणकर रिशिका | १६३३ | १७०० | ९६.०६% |
| **इन्स्ट्र्युमेन्टेशन विभाग (२०२५-२६)** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | आचरेकर चैतन्य अमुल | १२७९ | १४०० | ९१.३६% |
| २. | | अडेपवार भावेश राजू | १२६१ | १४०० | ९०.०७% |

**हिवाळी परिक्षा (२०२५) व उन्हाळी परिक्षा (२०२६)**

**कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभाग**

| क्रमांक | विभाग | एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण | A.T.K.T. | नापास | % (उत्तीर्ण) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तृतीय वर्ष | ७२ | ७२ | ० | ० | १००% |
| **इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग विभाग** | | | | | | |
| १ | तृतीय वर्ष | ४३ | ४१ | ० | २(WFLY) | ९५.३५ |
| **इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग** | | | | | | |
| १ | तृतीय वर्ष | ३९ | ३८ | ० | १ | ९७.४४ |

कधी कधी हक्क मागून मिळत नाहीत; ते मिळवावे लागतात.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग** | | | | | | |
| १ | तृतीय वर्ष | ६७ | ६६ | ० | १ | ९८.५०% |
| **इन्स्ट्रुमेन्टेशन विभाग** | | | | | | |
| १ | तृतीय वर्ष | ४२ | ४२ | ० | ० | १००% |

**गौरव यादी (हिवाळी २०२५ व उन्हाळी २०२६)**

**कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभाग**

| श्रेणी | विभाग | विद्यार्थ्याचे नांव | गुण | पैकी | % |
|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष | मुकादम मोझाम मुबिन | १६१६ | १७०० | ९५.०६% |
| **इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | पाटकर सुयश दिपक | १६३७ | १८०० | ९०.९४% |
| **इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | पवार ओम राजेंद्र | १५५९ | १७५० | ८९.०९% |
| **इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | पंडजी आदित्य उदयकुमार | १६५३ | १७०० | ९७.२४% |
| **इन्स्ट्रुमेन्टेशन विभाग** | | | | | |
| १. | तृतीय वर्ष | आचरेकर चैतन्य अमूल | १२७९ | १४०० | ९१.३६% |

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ जून २०२६ : सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उ. तावडे यांनी अमिटी बिझनेस स्कूल, अमिटी युनिव्हर्सिटी रायपूर द्वारे प्रकाशित केस बुक मध्ये (ISBN: ९७८-९३-७०२०-५७१-०, पहिली आवृत्ती: २०२६) वर्क फोर्स रिन्युवल अँड टॅलेन्ट ॲक्वीसिशन चॅलेंजेस इन अ फॅमिली ओन बिसनेसेस या शीर्षकाची एक केस स्टडी प्रकाशित केली.

३ जून २०२६ : सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांनी आयबीएम तर्फे आयोजित 'जनरेटिव्ह एआय फॉर ह्युमन रिसोर्सेस (एचआर) प्रोफेशनल्स' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला.



४ जून २०२६ : सहाय्यक प्रा. अदिती दामले-पवार यांनी 'गुगल जेमिनी फॉर एज्युकेशन' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.


Gemini Certified Faculty

This qualification is awarded to

**Aditi Damle - Pawar**

for having demonstrated the knowledge, skills, and basic competencies needed to use Google AI in higher education.

Certificate issued on 04/06/2026 | Certificate valid through June 4, 2029


Gemini Certified Educator

This qualification is awarded to

**Aditi Damle - Pawar**

for having demonstrated the knowledge, skills, and basic competencies needed to use Google AI in education.

Certificate issued on | Certificate valid through

१३ जून २०२६ : सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उमेश तावडे यांनी गुगल सर्टिफाइड एज्युकेटर स्तर १ आणि स्तर २ प्रमाणपत्र परीक्षा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.


Google Certified Educator

Level 1

This qualification is awarded to

**Prathmesh Tawade**

for having demonstrated the knowledge, skills, and basic competencies needed to use Google for Education tools.

Certificate issued on | Certificate valid through


Google Certified Educator

Level 2

This qualification is awarded to

**Prathmesh Tawade**

for having demonstrated the advanced knowledge, skills, and competencies required to implement Google for Education tools.

Certificate issued on 06/05/2026 | Certificate valid through


११ जून २०२६: डॉ. नीतिन जोशी यांनी हॉटेल वुडलँड येथे आशिदा इलेक्ट्रॉनिक्सच्या नेतृत्व करणाऱ्या व्यवस्थापकांसाठी 'बदल व्यवस्थापन' या विषयावर एक सत्र घेतले. या कार्यक्रमाला ५० हून अधिक जण उपस्थित होते.

१८ जून २०२६: डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्स येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या सोहळ्याचे आयोजन केले. श्रीमती सीमा वैद्य यांनी 'योगासनांचे महत्त्व' या विषयावर सत्र घेतले आणि भारत सरकारच्या आयुष मंत्रालयांतर्गत योग प्रमाणन मंडळाद्वारे अग्रगण्य योग संस्था म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या श्री अंबिका योग कुटीरमधील योग तज्ज्ञांनी योगासन प्रात्यक्षिक वर्गाचे (CYP) चे आयोजन केले.



२० जून २०२६ : पॉवर बीआय आणि ॲडव्हान्स्ड एक्सेल प्रमाणपत्र अभ्यासक्रमाबद्दल प्रात्यक्षिकाद्वारे एक माहिती सत्र आयोजित करण्यात आले.





२१ मे २०२६ : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी भारत सरकारच्या आयुष योजने अंतर्गत योग नियंत्रण मंडळाच्या योग शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी 'चयापचय आणि श्वसन विकारांसाठी योग' या विषयावर एक सत्र घेतले.

२२ मे २०२६ : प्रा. कीर्ती दिवेकर यांनी गुगल सर्टिफाइड एज्युकेटर - स्तर १ प्रमाणपत्र परीक्षा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.




२६ मे २०२६ : आशिदा इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. साठी व्यवस्थापन प्रशिक्षण (MDP) कार्यक्रमाचा भाग म्हणून, डॉ. विभूती सावे यांनी इन्व्हेंटरी : कॅश वेअरिंग अ डिफरंट ड्रेस या संकल्पनेवर लक्ष केंद्रित करून, इन्व्हेंटरी मॅनेजमेंट मॉड्यूल याविषयीची दोन सत्र घेतली. केस-आधारित शिक्षण, इन्व्हेंटरी डिटेक्टिव्ह आव्हाने आणि व्यावहारिक व्यवस्थापन फ्रेमवर्कच्या माध्यमातून, सहभागींना इन्व्हेंटरीची कामगिरी आणि खेळत्या भांडवलाचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी क्रॉस-फंक्शनल (विविध विभागांना जोडणाऱ्या) रणनीती शिकविण्यात आल्या.





•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिन्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.